# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ / अग्रहायण १, १९४० ( शके )

| | |
|---|---|
| (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी आणि फलोत्पादन मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

प्रश्नांची एकूण संख्या - ८०

---

### राज्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

(१) * १२७६९७ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस),

**ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी नापिकी, बोंडअळीमुळे पिकांचे झालेले नुकसान, कर्जबाजारी, दुष्काळी परिस्थिती व शेत मालांची बाजार भावातील अनिश्चितता अशा विविध कारणांमुळे आत्महत्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्हयांमध्ये १५ हजार २७२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन ६ हजार ८६५ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरविण्यात आली व ८ हजार २४१ शेतक-यांच्या कुटुंबांना शासनाच्या जाचक नियमावलीमुळे मदतीपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्हयात नापिकी, कर्जबाजारीपणाला कंटाळून माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१८ या ९ महिन्यांच्या कालावधीत ६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून जिल्हयात सन २०१५ ते २०१७ या तीन वर्षात २७६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे व कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २००४ ते जून, २०१८ पर्यंत एकूण ११३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन मराठवाडयातील ५५० शेतकऱ्यांनी सुध्दा नापिकी, कर्ज व बोंडअळीने पिकांच्या झालेल्या नुकसानामुळे आत्महत्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह अपात्र ठरलेल्या आत्महत्याग्रस्त कुटुंबांना पात्र ठरविण्यासाठी नियमावलीत शिथिलता आणण्याबाबत व शेतकरी आत्महत्या रोखण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात विविध कारणांमुळे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये एकूण २३५ आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) विदर्भातील ६ जिल्हयांमध्ये माहे जानेवारी, २००१ ते ऑक्टोबर, २०१८ पर्यंत विविध कारणांमुळे एकूण १५,६२९ आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी ७००८ प्रकरणे शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ मधील निकषान्वये पात्र तर ८४०६ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. तसेच २१५ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना रु.१.०० लक्षची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(३) नाशिक जिल्हयात गेल्या माहे जानेवारी, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत ७३ व्यक्तींनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी १७ प्रकरणे पात्र असल्याने शासन निर्णयाप्रमाणे रु.१.०० लक्षची मदत देण्यात आलेली आहे. तसेच ३० प्रकरणे अपात्र करण्यात आली आहे. २६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

| सन | एकूण | पात्र | अपात्र |
|---|---|---|---|
| २०१५ | ८५ | ५३ | ३२ |
| २०१६ | ८७ | ४६ | ४१ |
| २०१७ | १०४ | ५६ | ४८ |
| एकूण | २७६ | १५५ | १२१ |

कोल्हापूर जिल्हयात सन २००४ ते जून, २०१८ या कालावधीमध्ये एकूण ११३ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

मराठवाडयामध्ये माहे जानेवारी, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत विविध कारणांमुळे ६७४ आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी ४४५ पात्र प्रकरणी रु.१.०० लक्षची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह अपात्र ठरलेली प्रकरणे पात्र ठरविण्यासाठी नियमावलीत शिथीलता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.२४४/म-७, दि.२४/०८/२०१५ रोजीच्या निर्णयान्वये कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची

पुनर्रचना करण्यात आली असून राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी १) सर्व गरजू शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजना व राजीव गांधी जीवनदायी योजना राबविणे. २) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या मुलांना मोफत शिक्षणाबाबत उपाययोजना करणे. ३) शेती विकासासंदर्भात सर्व विभागाकडील शासकीय योजना राबविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.११९/म-७ (भाग-१), दि.२४/०७/२०१५ अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने विविध विभागांकडून सविस्तर प्रस्ताव उपलब्ध करुन घेऊन सर्व प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.११९/म-७ (भाग-२), दि.२४/०७/२०१५ अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्हयांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत जिल्हास्तरीय समिती, ग्रामस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिडदूगी-हसूरसासगिरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) * १२८४८४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिडदूगी-हसूरसासगिरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने रस्ता वाहतुकीस अयोग्य होऊन रस्त्यावर अनेक अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करुन रस्त्याच्या साईड गटाराचे बांधकाम करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम तथा पालकमंत्री यांचेकडे दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार उक्त रस्त्याची दुरुस्ती करून रस्त्याच्या साईड गटाराचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
प्रश्नांकित चंदगड हिंडगाव इब्राहिमपूर आजरा महागाव हलकर्णी हा रस्ता रा.मा.२०१ असा आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर लांबीतील डांबरी रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून साईड गटार बांधण्याचे काम नार्बाड २३ अंतर्गत मंजूर आहे. तसेच सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये मंजूर असून सद्यस्थितीत निविदा स्तरावर आहे.निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम तात्काळ हाती घेण्याचे नियोजन आहे.
सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कठोरा-वड्री-परसाळे-वड्री-मोहराळा (जि.जळगाव) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३) * १३१२०१ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर मतदारसंघातील डोंगर कठोरा - वड्री - परसाळे - वड्री - मोहराळा (जि.जळगाव) रामा ०४ (प्रजिमा-१३) या रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे रस्ता वाहतुकीस अयोग्य होऊन प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील रस्त्यांची खड्डे मुक्त महाराष्ट्र २०१८ या कार्यक्रमांतर्गत दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार डोंगर कठोरा-वड्री-परसाळे-वड्री-मोहराळा या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच रावेर मतदारसंघातील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या कंत्राटदार व सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याच्या एकूण ३५.२०० किमी लांबीपैकी किमी ४/०० ते १४/०० लांबी क्षतिग्रस्त असून उर्वरित लांबी सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्नाधीन रस्त्याच्या क्षतिग्रस्त भागातील खड्डे भरण्यात आले असून सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. तथापी, दुरूस्ती शक्य नसलेल्या रस्त्याच्या भागाचे मजबुतीकरण व नुतनीकरण प्राधान्यक्रम, निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधिन राहून करण्याचे नियोजन आहे. प्रश्न भाग-२ मधील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झालेली नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पूर्व आणि पश्चिम महामार्गाचे आधुनिकीकरण करण्याबाबत

**(४) * १२७२१९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व आणि पश्चिम महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी दोन्ही मार्गांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरिता सुमारे आठ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे तसेच या प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त प्रस्तावास मान्यता देऊन तातडीने प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) सन २०१६ मध्ये हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत या कामांचे समावेश करण्यात आला आहे.

(२) प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे.

(३) व (४) सदर कामे प्राधान्यक्रम, निकष, निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा-पंढरपूर रस्त्यासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(५) * १२९२२५ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-पंढरपूर रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीची मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरे आहे. तथापी सातारा-पंढरपूर महामार्गाचे चौपदरीकरण नसून दुपदरीकरण (कॉंक्रीट पृष्टभाग) करण्यात येत आहे.

(२) व (३) दि.१०.४.२०१८ रोजी मा.महसूल व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या सातारा ते म्हसवड या लांबीतील भूसंपादनाच्या प्रश्नाबाबत घेतलेल्या बैठकीमध्ये सदर रस्त्याच्या सुधारणा कामासाठी वहिवाटीच्या रूंदीपेक्षा जास्त जागेची आवश्यकता असल्यास त्यासाठी भूसंपादन करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे आवश्यक तेथे भूसंपादन प्रस्तावित करण्यात आले असून त्याचा मोबदला भूसंपादन कायद्यानुसार देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गणेश उत्सवाच्या कालावधीत कोकणात जाणाऱ्या वाहनांवर पथकर आकारल्याबाबत

**(६) * १३१३४० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था झाल्यामुळे गणेश उत्सवाच्या कालावधीत कोकणात जाणाऱ्या लाखो गणेश भक्तांच्या वाहनांना मुंबई-पुणे-

कोल्हापूर-सातारा महामार्गावर पथकर आकारण्यात येणार नसल्याचे आश्वासन मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी आश्वासन देऊनसुद्धा या काळात वाहनांवर पथकर आकारला गेल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून पथकर आकारणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या वाहनांना मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी मुंबई-गोवा महामार्ग तसेच मुंबई-पुणे-सातारा-कोल्हापूर मार्गावरील टोल नाक्यांवर जाता-येताना पथकरातून सवलत देण्याचा निर्णय दि.०६.०९.२०१८ रोजी घेण्यात आला होता. त्यानुसार ज्या वाहनांना परिवहन विभाग व पोलीस विभागामार्फत स्टीकर्स देण्यात आले होते, केवळ अशाच वाहनांना सुट देण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हुमणी रोगाच्या प्रादुर्भावाने पिकांचे झालेले नुकसान

**(७) * १२६६०१ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, औरंगाबाद, सातारा, उस्मानाबाद व सांगली जिल्हयातील ऊस, हळद, आले या पिकांवर हुमणी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावर्डे बुद्रुक, सावर्डे खुर्द, चौंडाळ, सोनाळी, निधोरी, बिद्री, पिराचीवाडी, साके, केनवडे (ता.कागल, जि.कोल्हापूर) या भागात पाऊस पुरेसा न पडल्याने पाण्याच्या कमतरतनेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर हुमणी किडीचा प्रादुर्भाव वाढल्याचे निदर्शनास आले असून राहुरी, रहाता, संगमनेर, कोपरगाव, श्रीगोंदे, अकोला, नेवासा, शेवगाव व पारनेर (जि.अहमदनगर) या तालुक्यात ऊसाची लागवड ३३ हजार हेक्टर क्षेत्रावर झाली असताना ऊस पिकांवर हुमणी रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माढा, पंढरपूर, माळशिरस, करमाळा (जि.सोलापूर) या तालुक्यात ऊसाचे सर्वाधिक उत्पादन होत असुन पाऊस कमी पडल्यामुळे पिकावर हुमणी या रोगाचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांचे लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवेखेड, वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील कृष्णा नदीकाठाजवळील शेतीत हुमणी आणि गोगलगायीच्या प्रादुर्भावाने पिकासह शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, त्याचप्रमाणे परांडा, भूम, वाशी (जि.उस्मानाबाद) या तालुक्यात ऊसाची लागवड १० हजार हेक्टर क्षेत्रावर झाली असून ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याचे लोकप्रतिनिधींनी मा.कृषीमंत्री यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणुन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हुमणी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यातील अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, औरंगाबाद, सातारा व सांगली जिल्ह्यातील ऊस पिकावर हुमणी किडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. तथापि, उस्मानाबाद जिल्ह्यातील ऊस पिकावर हुमणी किडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये हुमणी किडीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीबाबत महसूल व कृषि विभागामार्फत क्षेत्रीय स्तरावर संयुक्तपणे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच क्षेत्रिय स्तरावर हुमणी किडीच्या प्रादुर्भाव नियंत्रणाबाबत शेतकऱ्यांना लघुसंदेशांद्वारे उपचार करण्याबाबत सूचित करणे, क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांच्या बैठका घेणे व त्यांना प्रशिक्षण देणे, शेतकरी मेळावे भरवून त्यांना मार्गदर्शन करणे, वार्ताफलक, घडीपत्रिका व दैनंदिन वर्तमानपत्रांतून आपत्ती व उपाययोजनांबाबत प्रसिध्दी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोसम (ता.बागलाण, जि.नाशिक) नदीपात्रात अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(८) * १२८१२४ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोसम (ता.बागलाण, जि.नाशिक) नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा सुरु असून नागरीकांनी या अवैध वाळू उपशाबाबत अनेकवेळा रास्ता रोको आंदोलन करुनही वाळू माफियांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे भविष्यात भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने परिसरातील नागरीक भयग्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मोसम नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मोसम (ता.बागलाण, जि.नाशिक) नदीपात्रात "सर्रास अवैध वाळू उपसा" या मथळ्याखाली दिनांक ०६/०९/२०१८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात बाती प्रसिध्द झाली होती. आवर्तनादरम्यान किंवा पूरामुळे मोसम नदीवरील बंधाऱ्यातील वाळू वाहुन जाऊ नये याबाबत उपाययोजना करण्याबाबत व तेथील रात्रीचा अवैध वाळू उपसा कायमस्वरुपी बंद करण्याबाबत तसेच अन्य मागण्यांबाबत पाटबंधारे विभागास निवेदन देऊन ताहाराबाद-नामपूर रस्त्यावर माहे मे, २०१८ मध्ये रस्ता रोको केल्याबाबतची बाब निदर्शनास आली आह.

मोसम नदीपात्रालगत अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी असून पाईपलाईनद्वारे शेतीसाठी पाणी उपसा होत असल्यामुळे भविष्यात पाणी टंचाई निर्माण होवू शकते. तथापि, या संभाव्य पाणीटंचाईमुळे नागरिक भयग्रस्त झाले आहेत, अशी बाब निदर्शनास आली नाही. तहसिलदार, बागलाण यांच्याकडून पाणीटंचाईच्या सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खन्न व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा, तालुका व उपविभाग स्तरावर दक्षता पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर दक्षता पथकांनी बागलाण तालुक्यात दिनांक ०१/०४/२०१८ ते दि.३१/१०/२०१८ या कालावधीत केलेल्या कारवाई अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारी ४२ वाहने पकडण्यात आली असून त्यापैकी ३२ वाहनमालकांवर अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी

स्वामित्वधन व दंडापोटी रु.६२,२१,८०३/- एवढी रक्कम आकारुन वसूल करण्यात आली आहे. उर्वरित १० वाहनमालकांकडून रु.४३,८९,०००/- एवढ्या दंडात्मक रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(९) * १२६६८८ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतीचे नुकसान झालेल्या ३ लाख शेतकऱ्यांना २१० कोटी रुपयांची नुकसान भरपाई निकृष्ट दर्जाचे बियाणे विकणाऱ्या कंपन्यांनी देण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील ७१५ गावातील कपाशींवर शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भाव झाला असून येथील सुमारे दीड लाख हेक्टर कपाशीचे क्षेत्र बाधीत झालेले असताना ९ लाख शेतकरी बोंड अळीमुळे झालेल्या नुकसान भरपाईपासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन बोंडअळीच्या नुकसान भरपाईपोटी शेतक-यांना तीन टप्प्यात अनुदान वाटप करण्यात येणार होते त्यातील दोन टप्प्यातील अनुदानाचे वाटप करण्यात आले असून तिस-या टप्प्यातील अनुदान अदयापही वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील १ लाख ७५ हजार हेक्टर कपाशीचे क्षेत्र मागील वर्षी बोंडअळीच्या प्रादुर्भावाने बाधित झाले असुन शासनाने प्रति हेक्टरी ६ हजार ५०० रुपयाच्या मदतीची घोषणा करुन अनुदान वाटपाला माहे मे महिन्यात सुरुवात केली मात्र जवळपास पाच महिन्याचा कालावधी उलटूनही जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात ९०० पेक्षा जास्त गावांमध्ये कापूस पिकांवर बोंडअळी, तुडतुडे, फुलकिडे, मावारोग पडल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये निदर्शनास आले असून रोग नियंत्रण करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बोंडअळी नियंत्रण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत काय,

(५) असल्यास, तद्नुसार बोंड अळींच्या प्रादुभार्वामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत व नुकसान भरपाई देण्यास नकार देणाऱ्या कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने आतापर्यंत महाराष्ट्र कापूस बी-बियाणे अधिनियम, २००९ व नियम, २०१० मधील तरतुदीनुसार सुमारे ११४७ कोटी रूपये नुकसान भरपाई देण्याबाबत बियाणे कंपन्यांना आदेशीत करण्यात आलेले आहे.

(२) खरीप हंगाम २०१७ मध्ये बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाच्या झालेल्या नुकसानीपोटी बाधीत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तिसऱ्या हप्त्याचा निधी दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१८ रोजी महसूल व वन विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) बुलढाणा जिल्हयात पहिल्या टप्प्यात रू.३५.८२ कोटी व दुसऱ्या टप्प्यात रू.५३.७४ कोटी अशा प्रमाणात प्राप्त निधीचे वाटप करण्यात आलेले असून तिसऱ्या टप्प्यातील रू.४४.७८ कोटी निधी वाटपाची प्रक्रिया चालू आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) राज्यात गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने बियाणे कंपन्यांकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत महाराष्ट्र कापूस बी-बियाणे अधिनियम, २००९ व नियम, २०१० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे. यासंदर्भात १२ कापूस बियाणे उत्पादक कंपन्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केलेली असून मा.उच्च न्यायालयाने उर्वरीत शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे आदेश निर्गमित करण्याच्या प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सुरु केलेल्या शिवशाही बसचे होत असलेले अपघात

**(१०) * १२६८३७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन**

**पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळात गत वर्षभरात दाखल झालेल्या भाडेतत्वावरील व स्वत:च्या मालकीच्या शिवशाही बसचे किमान २३० अपघात झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेतत्वावर शिवशाही बस गाडया चालविणारे सात कंत्राटदार असून लांब पल्ल्याच्या एका फेरीनंतर पुन्हा परतीच्या मार्गावर नवीन चालक देण्याची सूचना राज्य मार्ग परिवहन महामंडळाने कंत्राटदारांना देऊनही त्याबाबत अंमलबजावणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत करण्यासह नियमांचे पालन न करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत व अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

भाडेतत्वावरील बसचे ८४ तर स्वमालकीच्या बसचे १५६ अपघात झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाच्या स्वमालकीच्या ५०० व भाडेतत्वावरील ४९८ अशा एकूण ९९८ शिवशाही बसेस चालनात आहेत. सदर शिवशाही बसेस चालनात आल्यापासून माहे जुलै, २०१८ पर्यंत किरकोळ, गंभीर व प्राणांतिक स्वरुपाचे एकूण २४० अपघात झालेले असून, सदर अपघातांमध्ये जखमी व मृत प्रवाशांच्या वारसांना एकूण रु.१४,५८,१७५.०० एवढी रक्कम नुकसान भरपाईपोटी अदा करण्यात आलेली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे अपघात टाळण्यासाठी चालक उजळणी प्रशिक्षण, अपघातग्रस्त चालकांचे विशेष प्रशिक्षण, चालकांची नेत्र/आरोग्य तपासणी, प्रोत्साहनपर बक्षिसे/बिल्ले इ,देण्यात येत आहेत. त्याचबरोबर सुरक्षितता मोहिम राबवून चालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येवून प्रबोधन करण्यात येते.

तसेच, खाजगी भाडेतत्वावरील घेण्यात आलेल्या बसवरील चालकांना राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती प्रशिक्षण केंद्र, भोसरी, पुणे येथील ए.डी.टी.टी. ट्रॅकवरील (संगणिकृत वाहन चालन चाचणी पथ) चाचणी पास करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच, सदर चालकांना महामंडळाच्या चालकांप्रमाणे ४८ दिवसांचे सेवापुर्व प्रशिक्षण देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे खाजगी पुरवठादार कंपन्यांसोबत नियमितपणे बैठका घेवून विनाअपघात सेवा देण्याच्या अनुषंगाने योग्य ती दक्षता घेणे व उक्त चालकांकडून गैरप्रकार झाल्यास तात्काळ कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती-चांदूर रेल्वे या रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत

**(११) * १२९९०१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-चांदूर रेल्वे या मार्गाची गत काही वर्षामध्ये दुरूस्ती न झाल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून अपघाताचे प्रमाण वाढल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर अनेक वेळा तात्पुरत्या स्वरुपात खड्डे बुझविण्याचे काम करण्यात येत असल्याने पुन्हा काही दिवसातच खड्डे पडत असून त्यामुळे संपूर्ण रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत मागणी नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे तातडीने नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अमरावती ते चांदुर रेल्वे पर्यंतचा रस्ता दुरुस्तीचे काम व्दिवार्षिक देखभाल व दुरुस्ती योजने अंतर्गत मंजुर असून रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आमोदे ते कळवाडी (जि.नाशिक) या दोन गावांना जोडणाऱ्या गिरणा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(१२) * १३३०४७ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील आमोदे (ता.नांदगांव) ते कळवाडी (ता.मालेगांव) या दोन गावांना जोडणा-या गिरणा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, नांदगांव यांनी दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी व त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार आमोदे ते कळवाडी या दोन गावांना जोडणाऱ्या गिरणा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर ठिकाणची पाहणी करण्यात आली आहे.

(३) गिरणा नदी आमोदे व नरडाणे या दोन गावांमध्ये आहे. अमोदे ते नरडाणे-कळवाडी असा रस्ता अस्तित्वात नाही. गिरणा नदीचे पात्र अंदाजे ६०० मीटर इतके रुंद आहे. आमोदे ते कळवाडी या गावांना जाण्यासाठी सद्यस्थितीत १७.०० कि.मी.लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागतो.

गिरणा नदीवर पुल झाल्यास आमोदे (ता.नांदगांव) व नरडाणे (ता.मालगांव) ही गावे जोडली जावून आमोदे ते नरडाणे कळवाडी या गावामधील अंतर ९.०० कि.मी. इतके होईल.

प्रश्नांकित पुलासाठी रस्त्यासह अंदाजे रु.१५.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. इतका निधी जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणे शक्य नाही. त्यामुळे या मोठ्या पुलाच्या बांधकामाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे चंद्रभागा नदीवर उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(१३) * १२७४०९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर),**

**श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे चंद्रभागा नदीवर पुंडलिक मंदिर ते शेगाव दुमाला हद्द असा उड्डाण पूल मंजूर असून तहसीलदार पंढरपूर यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आचारसंहिता सुरु असल्यामुळे पुलाचे काम सुरु करण्यास मान्यता न दिल्याने अद्यापपर्यंत पुलाचे काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे काम तातडीने सुरु करण्यासाठी महाराज मंडळीनी सन २०१५ मध्ये प्राणांतिक उपोषण केले असून पुलाचे काम प्रलंबित राहिल्यामुळे पावसाळ्यात या पुलावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर काम सुरु करून तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर पुल दिनांक १२.९.२०१४ च्या शासन निर्णयात समाविष्ट असून या कामासाठी रु. १५.०० कोटी रक्कम प्रस्तावित करण्यात आली आहे.

(२) याबाबतची माहिती उपलब्ध नाही.

(३) व (४) वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या रकमेस मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुलाचे काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'हिरकणी कक्ष योजना' प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(१४) * १२७६६८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या मातांना बाळाला स्तनपान देण्यासाठी सुरु केलेल्या हिरकणी कक्ष योजनेची योग्य अंमलबजावणी न झाल्यामुळे बहुतांश ठिकाणच्या बसस्थानकावरचा हिरकणी कक्ष बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कुर्ला नेहरुनगर, मुंबई सेंट्रल आणि परळ, तसेच पुणे, विदर्भ, मराठवाडा येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकावर उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाची जनजागृती न झाल्यामुळे सदर योजना बंद स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरची हिरकणी कक्ष योजना पुनश्च: नव्याने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या सुमारे १८२ प्रमुख बसस्थानकांवर 'हिरकणी कक्ष' कार्यान्वित आहेत

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्यांचे निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे झालेले नुकसान

**(१५) * १२९७९६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात मागील तीन-चार वर्षात टोमॅटो, फ्लॉवर, भुईमूग, बाजरी व कोबी या वाणांच्या भेसळयुक्त व निकृष्ट बियाणांमुळे

शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पिकांचे वाण विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी केली असतानाही त्याकडे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच भेसळयुक्त व निकृष्ट बियाणे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०१६-१७ मध्ये सिंजेंटा कंपनीचे टोमॅटो पिकाचे टीओ-१०५७ या वाणाबाबत प्राप्त तक्रारींची दखल घेऊन बाधीत क्षेत्राचे पंचनामे केले असता सदर वाण विषाणुजन्य रोगास बळी पडत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सिंजेंटा कंपनीच्या टोमॅटो पिकाच्या टीओ-१०५७ या वाणास आंबेगांव व जुन्नर तालुक्याकरीता विक्री बंदीचे आदेश देण्यात आले होते. तसेच, यासंदर्भात संबंधीत बियाणे कंपनीकडून बियाणे, खते व औषधे या स्वरूपात शेतकऱ्यांना मदत करण्यात आलेली आहे.

आंबेगांव तालुक्यात सिंजेंटा कंपनीच्या फ्लॉवर पिकाच्या स्नोहर्ट या वाणाबाबत एक तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने बाधीत क्षेत्राचा पंचनामा केला असता बोरॉन या मुलद्रव्याच्या कमतरतेमुळे फुलकोबीचे गड्डे गुलाबी झाल्याचे निष्पन्न झालेले असून बियाणांमध्ये दोष असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सन २०१७-१८ मध्ये बाजरी या पिकाच्या वाणाबाबत एका शेतकऱ्याची तक्रार प्राप्त झालेली होती. तथापि, तद्नंतर शेतकऱ्याने बियाणाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी दिलेले आहे.

सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये भुईमुग या पिकाच्या वाणाबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

सन २०१८-१९ मध्ये फ्लॉवर पिकाच्या वाणांबाबत दोन तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. यामध्ये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तालुका स्तरीय निवारण समितीने बाधीत प्रक्षेत्राची पाहणी केली असता ७८% क्षेत्रावरील मालाची काढणी शेतकऱ्याने केलेली होती. त्यामुळे समितीला पिकाची पाहणी न करता आल्याने निष्कर्ष नोंदविता आलेला नाही. तसेच, दुसऱ्या तक्रारीसंदर्भात संबंधीत बियाणे कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा-काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) * १२८७७२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा-काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने रस्ता वाहतूकीस अयोग्य झाला असल्याचे तसेच सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती न केल्यास नगर-दौंड मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा काष्टी येथील नागरीकांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्त्यावरील खड्डे बुझविण्यासाठी शासनाकडून आलेल्या डांबरापैकी ४० टक्के डांबर ठेकेदारांना न देता परस्पर अन्य ठेकेदाराला सार्वजनिक बांधकाम विभागाने विकल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार श्रीगोंदा-काष्टी रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत व परस्पर अन्य ठेकेदाराला डांबर विकणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) श्रीगोंदा-काष्टी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण प्राधान्यक्रम, मंजुरी, निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे. तसेच, प्रश्न भाग-२ बाबत चौकशी करण्याचा व अधिका-यांविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील डाळिंब बागांचे तेल्या रोगामुळे झालेले नुकसान

**(१७) * १२७८२८ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील घोटेवाडी, कहांडळवाडी, सायाळे, वावी व परिसरातील गावांमधील डाळिंब बागांवर तेल्या रोग पडल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेल्या रोगावर कोणतीही प्रभावी उपाययोजना उपलब्ध नसल्याने किडीवर नियंत्रण मिळविणेसाठी शेतकऱ्यांकरिता मार्गदर्शनपर शिबीर आयोजित करावे तसेच शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांस तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तालुका कृषी अधिकारी, सिन्नर (नाशिक) यांच्याकडे दिनांक २२ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्यांनी हजारो रूपये किटकनाशकावर खर्च करून पिकविलेल्या डाळींब बागांवर तेल्या व मर

रोगाचा प्रादुर्भाव वाढला असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांकरिता मार्गदर्शनपर शिबीरे आयोजित करण्याबाबत व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील घोटेवाडी, कहांळवाडी, सायाळे, वावी व परिसरातील गावांमध्ये माहे जुलै, २०१८ मध्ये हवामानातील वाढलेल्या आर्द्रता व ढगाळ हवामानामुळे १२५ हे. क्षेत्रावर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून आले.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून प्रचार व प्रसिध्दीची कामे केली आहेत. ४४ तसेच शेतकऱ्यांना विविध माध्यमाद्वारे मार्गदर्शन केले आहे.त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव कमी झाल्याचे पाहणीमध्ये आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथे बनावट दस्तावेजांच्या आधारे सदनिकांची नोंदणी झाल्याबाबत

**(१८) * १२८४७७ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदिवली पंचानंद, देसलेपाडा, भोपर, आडिवली ढोकळी, सागाव, पिसवली, गोळवली, सोनारपाडा, मानगाव व मानपाडा (ता.कल्याण, जि.ठाणे) या भागातील बेकायदा इमारतींमधील सदनिकांचे नोंदणीकरण थांबविण्याचे आदेश कल्याण-डोंबिवली महापालिकेने संबंधित दुय्यम निबंधकांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील सदनिकांचे बनावट नोंदणीकरण होत असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबईतील वरळी मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना डोंबिवलीतील गांधीनगर येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केल्याचे काही दस्तऐवज मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बनावट दस्तावेजाच्या आधारे होत असलेल्या बेकायदा नोंदणीबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, महसूल यांच्याकडे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून बनावट दस्तावेजांच्या आधारे नोंदणी करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सहायक संचालक नगर रचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्या दि.०९ मे, २०१८ रोजीच्या तसेच उपायुक्त (अबांनि), कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्या दि.२९ जून, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सह जिल्हा निबंधक, ठाणे तसेच सह दुय्यम निबंधक, कल्याण (क्र.१,२ व ५) व सह दुय्यम निबंधक, डोंबिवली (क्र.३ व ४) यांना, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.५१०/नवि-२०, दि.०३ मे, २०१८ रोजीच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार "कल्याण- डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामाचे/ मिळकतीचे खरेदी/विक्री व्यवहाराची नोंदणी करण्यापूर्वी सदर मिळकत अधिकृत असल्याची खात्री करण्याचे कळविण्यात आले आहे."

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील काही ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे (बनावट विकास प्रस्तावाव्दारे) दस्ताच्या बेकायदा नोंदी होत असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे तसेच शासनाकडे प्राप्त झाल्या असुन त्याप्रमाणे अश्या स्वरुपाच्या प्रकरणांची नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयामार्फत पडताळणी केली असता, सह दुय्यम निबंधक, कल्याण-३

कार्यालयात एकूण १३ दस्तांची नोंदणी बनावट अकृषीक आदेश जोडून झाली असल्याचे निदर्शनास आले असल्याने सह दुय्यम निबंधक, कल्याण-३ यांनी, उक्त प्रकरणी संबंधित पक्षकार मे.बल्लाळेश्वर कन्स्ट्रक्शनचे भागीदार श्री. सुभाष पाटोळे यांचे विरोधात नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ प्रमाणे मानपाडा पोलिस स्टेशन, डोंबिवली (पूर्व), ता.कल्याण येथे गुन्हा दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरगांव-पेरले-खराडे-हेळगांव पाडळी-सुर्ली-रहिमतपूर (ता.कोरेगाव, जि.सातारा) या रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत

**(१९) * १२८४११ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरगांव-पेरले-खराडे-हेळगांव पाडळी-सुर्ली-रहिमतपूर (प्रजिमा ३९) (ता.कोरेगाव, जि.सातारा) या रस्त्यावरील सुर्ली ते रहिमतपूर या टप्प्यातील रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी तसेच माळी मळा येथील कमी उंचीच्या पुलाच्या ठिकाणी नवीन उंच पूल बांधण्यासाठी या रस्त्याचा समावेश रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम योजनेत करुन यासाठी ३ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी व माळी मळा येथील कमी उंचीच्या पुलाच्या ठिकाणी नवीन उंच पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) उक्त निवेदनातील रस्त्याच्या व पूलाच्या कामांना निधी, निकष व प्राध्यन्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयाला लागलेली आग

**(२०) * १२६७०८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयाला आग लागून तेथील परवान्यांशी संबंधित कागदपत्रे, संगणक, २९ हजार स्मार्ट कार्ड तसेच ७ हजार छापील परवाने असलेले स्मार्ट कार्ड आगीत जळाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ मध्ये देखील एक हजार फुटांच्या गोदामाला आग लागून प्रादेशिक परिवहन कार्यालयातील जुनी कागदपत्रे आणि लाकडी सामानाचे नुकसान झाले असल्याने आता लागलेल्या आगीबाबत साशंकता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) या कार्यालयातील “सी” ब्लॉक येथे दि.०५ ऑगस्ट २०१८ रोजी लागलेल्या आगीमध्ये २२ हजार कोरे स्मार्ट कार्ड व ८ हजार तयार स्मार्ट कार्ड जळाली आहेत.

(२) सन २०१५ मध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) या कार्यालयात आग लागली होती हे खरे आहे. तथापि, दि.०५ ऑगस्ट २०१८ रोजी लागलेल्या आगीबाबत साशंकता निर्माण झालेली नाही.

(३) यासंदर्भात शासनाने अहवाल मागविला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिसर ते काशिमिरा (जि.ठाणे) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याबाबत

**(२१) * १२८८४५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर ते काशिमिरा (जि.ठाणे) या रस्त्याचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी माहे जून, २०१७ मध्ये पूर्ण केले असून माहे जुलै, २०१८ मध्ये झालेल्या पावसामध्ये या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर व त्याच्याशी संगनमत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुंबई-अहमदाबाद महामार्गामधील दहिसर ते काशिमिरा (जि.ठाणे) या रस्त्याचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग,ठाणे यांचेकडून करण्यात आलेले नसून सदर रस्त्याचे सहापदरीकरण आणि त्यासोबतच दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड चे काम हे आधीच पूर्ण झालेले आहे.

तसेच या भागात, विस्तारित केलेल्या सर्व्हिस रोडचे काम हे मीरा भाईंदर महानगरपालिकाव्दारे करण्यात आलेले असून, जुलै २०१८ च्या पावसामध्ये या विस्तारीत केलेल्या सर्व्हिस रस्त्याची दुरावस्था झालेली आहे, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी कळविले आहे.

(२) व (३) दहिसर ते काशिमिरा (जि.ठाणे) रस्त्याचे काम व सदर रस्त्याच्या देखभालीचे काम हे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत एन.एच.डी.पी. फेज-५ च्या अंतर्गत डी.बी.एफ.ओ. पॅटर्न (बीओटी) तत्वावर उद्योजकाला देण्यात आलेले आहे. सदयस्थितीत सदर रस्ता हा चांगल्या स्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानासह जिवीत व वित्त हानी झाल्याबाबत

**(२२) * १२६५९४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब**

**पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोकणासह पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व राज्यात इतर ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठया प्रमाणात पिकांसह जिवीत व वित्त हानी झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी, भुदरगड व आजरा तालुक्यांमध्ये अंदाजे ३ हजार ५०० ते ४ हजार ५०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून या जिल्हयातील राधानगरी, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहूवाडी, गगनबावडा तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ऊस, भात, नाचणी व भुईमूग यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन

शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.कृषी राज्यमंत्री व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, मराठवाडयातील परभणी, हिंगोलीसह नांदेड जिल्हयातील ८५ मंडळात मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असुन नांदेड जिल्हयात मुसळधार पावसामुळे ९५२८ हेक्टर क्षेत्रातील शेती पिकांच्या नुकसानीसह २६ लहान व मोठी जनावरे मृत्युमूखी पडली असून १ हजार १०९ कच्च्या घरांची पडझड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजा डोंगरगांव (ता.देवरी, जि.गोंदिया) येथे दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ रोजी ग्रामपंचातीच्या हद्दीत वादळ वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे घरांची, अन्न धान्यांची, झाडांची, जनावरांची, शेतीची तथा आर्थिक मालमत्तेचे मोठ्याप्रमाणात झालेल्या नुकसानाचा पंचनामा करून भरपाई मिळणेबाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील बिटरगाव, कामखेडा, वंजारवाडी, टाकळगाव, इटी, भोकरंबा आदी गावातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन, सर्व रब्बी पिकांचे, फळबागा, ऊस पिकांचे व घरांसह शाळेच्या इमारतींचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या गारपिठीमुळे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पालघर जिल्ह्यात माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अतिवृष्टी व पुरामुळे पिकांसह मालमत्तेचे नुकसान झाले असताना जिवितहानी झाली असुन संगमेश्वर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यामध्ये दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे ग्रामस्थांची घरे, गुरांचे गोठे तसेच भात पिक आदींचे मोठे नुकसान झाले तसेच कर्जत (जि.रायगड) तालुक्यात दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तेथील शेतकऱ्यांच्या भातपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात कोकणासह पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व राज्यात इतर ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसामुळे पिकांसह वित्त व जिवीत हानी झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, मराठवाडयातील हिंगोली जिल्हयात माहे जून ते ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतिपिकांचे/फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, मराठवाड्यातील परभणी जिल्हयात माहे जून ते ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतिपिकांचे/फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

नांदेड जिल्हयामध्ये माहे जून ते ऑगस्ट, २०१८ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे एकूण ७४६०८.३ हे. क्षेत्रावरील शेतिपिकांचे व फळपिकांचे ३३ टक्क्यांच्या वर नुकसान झाल्याचे तसेच २९८२ कच्च्या घरांची अंशत: पडझड व १९६ लहान व मोठी जनावरे मृत्युमूखी पडल्याचे निदर्शनास आले.

(४) होय.

(५) लातूर जिल्हयातील रेणापूर तालुक्यांमध्ये बिटरगांव, कामखेडा, वंजारवाडी व टाकळगांव या गावांमध्ये दिनांक ०४ ऑक्टोबर २०१८ रोजी गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीचे महसूल व कृषि विभागाकडून संयुक्तपणे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) पालघर जिल्हयात माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अतिवृष्टी व पुरामुळे वित्तहानी, जिवितहानी तसेच शेतिपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यामध्ये दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे गुरांच्या गोठ्यांचे व फळपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले. तथापि,

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामध्ये दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे ग्रामस्थांची घरांचे, गुरांचे गोठ्यांचे व शेतिपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतिपिकांचे/फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(७) राज्यात माहे जून ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतिपिकांच्या/फळपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन संयुक्त स्वाक्षरी अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासनपत्र दिनांक ०५.०९.२०१८ अन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर संयुक्त स्वाक्षरी अहवाल सर्व विभागीय आयुक्तांकडून प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे. सदर कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या जिवितहानी व वित्तहानीप्रकरणी शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ नुसार मदतनिधी वाटपाची कार्यवाही संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरु आहे.

राज्यात माहे ऑक्टोबर २०१८ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतिपिकांच्या/फळपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून सदर कालावधीत झालेल्या जिवितहानी व वित्तहानीप्रकरणी शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ नुसार मदतनिधी वाटपाची कार्यवाही संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

## तळेबाजार व शिरगाव (ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग) या गावांसाठी बाह्यवळण मार्ग बांधण्याबाबत

**(२३) * १२७८३५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेबाजार व शिरगाव (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावातून जाणाऱ्या देवगड-निपाणी राज्य मार्गाचा रस्ता अरुंद असल्याने सदर गावात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातून बाह्यवळण रस्ता तयार करण्याबाबत अध्यक्ष लोकसंवाद ट्रस्ट देवगड यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली यांचेकडे लेखी निवदेन दिले असून या परिसरातील प्रवाशांनी गत १५ वर्षापासून सातत्याने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार तळेबाजार व शिरगाव या गावातून जाणाऱ्या देवगड-निपाणी राज्य मार्गासाठी बाह्यवळण मार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदरचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील पुनर्वसीत गावांत मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) * १३२५१६ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदी काठावरील सन १९९० ते १९९५ दरम्यान पुनर्वसन केलेल्या १३ गावात अदयाप रस्ते, आरोग्य व शिक्षण इत्यादी मुलभूत सुविधांचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील ग्रामस्थांनी आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा इशारा देवून येथे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन उमरी तालुक्यातील गोदावरी काठावरील पुर्नवसन केलेल्या गावांत मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. काही ग्रामस्थांनी या आशयाची मागणी केली आहे.

(३) नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील १३ गावे पुरबाधित आहेत. मूळ पूरबाधित गावात ज्या नागरी सुविधा उपलब्ध होत्या त्या सुविधा शासनामार्फत त्याच वेळेस पुरविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे लेंडी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना केलेल्या भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहार

**(२५) * १२८६२६ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे लेंडी प्रकल्पातील रावणगाव व भाटापूर प.मु. येथील धरणग्रस्तांना भूखंड वाटप करण्यात आले असून या भूखंड वाटपात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार भूखंड वाटपात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार मुखेड यांनी चौकशी केली असता मौजे रावणगाव व भाटापूर येथील प्रकल्पग्रस्तांना खानापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे सन १९९६ व २०१२ मध्ये भूखंड वाटप करण्यात आले असून त्यामध्ये ११ कुटूंबांना दुबार भूखंड वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले असून नियमानुसार खुलासे घेऊन जिल्हाधिकारी नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनांना नियमबाह्यरित्या योग्यता प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(२६) * १२७८८२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिकेनुसार वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देतांना नियमानुसार काटेकोर तपासणी करण्याचे आदेश न्यायालयाने देऊनही राज्यातील यवतमाळ, कोल्हापूर, पुणे,

औरंगाबाद, पनवेल व ठाणे या प्रादेशिक आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनांची काटेकोर तपासणी न करता योग्यता प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास परिवहन विभागाच्या ३७ वाहन निरीक्षक आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांना निलंबित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात एकूण ७० वाहन निरिक्षक व सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक यांच्यावर कारवाई करण्याचे प्रस्तावित असतांना केवळ ३७ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाने वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया इन कॅमेरा करण्याचे आदेश दिलेले असतानाही अनेक ठिकाणी कॅमेऱ्याची व्यवस्था केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्यासह या प्रकरणातील उर्वरित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व वाहनांची काटेकोरपणे तपासणी करुन वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यवतमाळ, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, पनवेल व ठाणे या उप प्रादेशिक/ प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनांची तपासणी करण्याकरीता चाचणी पथ व अनुषंगिक सुविधा उपलब्ध नसल्याने वाहन तपासणीत अनियमितता दिसून आली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्यता प्रमाणपत्र देणे शक्य झालेले नाही. यास्तव २८ मोटार वाहन निरिक्षक व ९ सहायक मोटार वाहन निरिक्षक अशा ३७ अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात आले असून, या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त आणखी ०७ मोटार वाहन निरिक्षक व ०७ सहायक मोटार अशा १४ अधिकाऱ्यांविरुध्दही नियमानुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव कार्यवाहीत आहे.

या प्रकरणातील निलंबित ३७ मोटार वाहन निरिक्षक / सहायक मोटार वाहन निरिक्षक या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, उर्वरीत १४ मोटार वाहन निरिक्षक / सहायक

मोटार वाहन निरिक्षक यांच्याबाबतचा प्रस्तावही कार्यवाहीत आहे. याशिवाय या प्रकरणातील नियंत्रक अधिकाऱ्यांविरूध्दही शिस्तभंगविषयक कारवाई का सुरू करण्यात येऊ नये याबाबतची नोटीस संबंधितांना बजाविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरण करण्याबाबत

**(२७) * १२७१९४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वारंवार अपघात घडून शेकडो प्रवाशांचा मृत्यु होत असतानाही वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत वर्दळीच्या असणाऱ्या सातारा-कागल या टप्प्यातील महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम गत १४ वर्षापासून रखडले असल्याचे तसेच रस्त्यावर सेवारस्ते (पोच मार्ग) उपलब्ध नसतानाही वाहनांकडून टोल वसुली सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील खंबाटकी घाटातील रस्त्यांवर अनेक खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघाताच्या संख्येत वाढ होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार उक्त महामार्गावरील अपघातांना आळा बसण्यासाठी महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत तसेच रस्त्यावरील टोल वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सातारा-कागल या टप्प्यातील महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तसेच १६८ कि.मी.लांबीच्या सेवा रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कोल्हापूर यांचेकडून बी.ओ.टी.तत्वावर पूर्ण झालेले आहे. सदयस्थितीत सदर प्रकल्प सवलत कालावधी अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या टप्प्यात आहे.यास्तव त्यानुसार सवलतीच्या कालावधीत सदर रस्त्यावर मंजूर करारनाम्यानुसार टोल वसुली सुरु आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कोल्हापूर यांनी कळविले आहे.
(२) या महामार्गावरील खंबाटकी घाटातील अपघात हे खड्डयांमुळे झालेले नसून पोलिसांच्या नोंदीनुसार वाहनचालकाच्या चुकीमुळे तसेच वाहनातील यांत्रिक बिघाडामुळे झाल्याचे तसेच सदर महामार्गावरील पुणे-सातारा या महामार्गाच्या टप्प्यात सन २०१५ ते चालू वर्षापर्यंत प्रतीवर्षी अपघातांच्या संख्येत घट होऊन मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या कमी होत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.
(३) व (४) उक्त प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापी उक्त महामार्गावरील अपघातांना आळा बसण्यासाठी महामार्गाच्या पुणे-सातारा या टप्प्यातील रस्त्याच्या कि.मी.७२५/०० ते ८६५/३५० (१४०.३५ कि.मी.) मधिल सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सदयस्थितीत प्रगतीपथावर असून त्यापैकी सुमारे १३० कि.मी.च्या सहापदरीकरणाचे काम पूर्णत्वास आले असून उर्वरीत काम सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

तसेच सातारा-कागल या महामार्गाच्या प्रस्तावित सहापदरीकरणाचे काम हायब्रीड ॲन्युटी मोड पध्दतीवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार सदर प्रस्तावित सहापदरीकरणाचे काम सदयस्थितीत निविदा स्तरावर आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

सद्यस्थितीत सुरु असलेली टोलवसुली ही उक्त महामार्गावर झालेल्या चौपदरीकरणाच्या अनुषंगाने मंजूर करारनाम्यानुसार सुरु असल्याने ती बंद करण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील नेहरूनगर (ता.मोताळा) व गहूमाळ, चाळीसटापरी आणि भिंगारा (ता.जळगाव जामोद) या गावांना महसुली दर्जा देण्याबाबत

**(२८) * १२८५५३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेहरूनगर (ता.मोताळा, जि.बुलढाणा), गहूमाळ, चाळीसटापरी व भिंगारा (ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा) या गावांना महसुली दर्जा प्राप्त नसल्याने तेथील नागरीक विविध शासकीय योजनांपासून तसेच रस्ते, वीज, आरोग्य व शिक्षण इत्यादी मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेहरूनगर या गावास महसुली दर्जा प्रदान करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१८ रोजी व त्या सुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर गावांना महसुली दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) भिंगारा वगळता नेहरूनगर ता.मोताळा, जि.बुलढाणा गहूमाळ, चाळीसटापरी ता.जळगांव जामोद, जि.बुलढाणा यांना महसुली गावाचा दर्जा देण्यात आलेला नाही.
(२) व (३) दि. १३ सप्टेंबर, २०१८ चे यांसंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना प्राप्त झाले आहे.

नेहरूनगर या गावास महसूली दर्जा प्रदान करणेबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे स्तरावर तपासणी सुरू आहे.
(४) यासंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून शासनांस प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार मौ. भिंगारा या महसूली गावांतर्गत चाळीसटापरी व मौ. कुवरदेव अंतर्गत गहूमाळ या वस्त्यांमधील जमीन ही वन विभागाची आहे. वन जमिनीवर वसलेल्या गावांना महसुली दर्जा देण्यासंदर्भात वन विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयाच्या समुद्रकिनारी विनापरवानगी मासेमारी करणाऱ्या नौकांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) * १२७५०७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात १ सप्टेंबरपासून पर्ससीन नौकांकडून सागरी मासेमारीला सुरुवात होणार असुन परवानाधारक पर्ससीन नौका २७२ तर परवानाधारक पारंपरीक मच्छीमार नौका ३५० आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी-सिंधुदूर्ग समुद्राच्या किनारी परप्रांतीय मासेमारी करणाऱ्या बोटींनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले असून सदर बोटी परवानगी नसतांनाही नियम डावलून मासेमारी करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे तसेच या परप्रांतीय बोटी मासेमारी करुन रत्नागिरीच्या मिरकर वाडा बंदर वा लगतच्या नर्मदा जेट्टीवर मासळी उतरवून पुन्हा या ठिकाणी मासेमारी करण्यासाठी येत असल्याने स्थानिक मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकृत नौकांव्यतिरिक्त बेकायदा मासेमारी करणाऱ्या ५०० पेक्षा अधिक नौका जिल्ह्याच्या सागरी हद्दीत बेकायदा मासेमारी करीत असल्याने या पर्ससीन नौकांकडून पारंपरीक सागरी क्षेत्रात होणारी घुसखोरी व परवाना नसलेल्या शेकडो नौकांकडून होणारी बेकायदा मासेमारी रोखण्यासाठी कारवाई करावी अशी मागणी पारंपरीक मच्छीमार संघटनांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मत्स्य आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) पारंपरीक मच्छीमार संघटनांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मत्स्य आयुक्तांकडे निवेदन दिले असून त्यानुषंगाने सप्टेंबर, २०१८ ते आजतागायत एकूण १६ अवैध मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छीमार नौकांना व ३ परप्रांतीय नौकांना अशा एकूण १९ नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, त्यांचे दावे अभिनिर्णय अधिकारी रत्नागिरी व राजापूर यांचेकडे दाखल केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देहू-आळंदी-पंढरपूर या पालखी मार्गावरील वाडीकुरोली ते पंढरपूर (जि.सोलापूर) या टप्प्यातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३०) * १२९३७७ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहू-आळंदी-पंढरपूर या पालखी मार्गावरील वाडीकुरोली ते पंढरपूर (जि.सोलापूर) या टप्प्यातील रस्त्याचे नुतनीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीमध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या नुतनीकरणासाठी पंढरपूर येथील दगडी पुलाजवळ तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सन २०१० मध्ये भूमीपूजन केले असतानाही रस्त्याच्या कामास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व मा.मुख्यमंत्री यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने वाडीकुरोली ते पंढरपूर या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) याबाबत लेखी दस्तऐवज या विभागाकडे प्राप्त नाहीत.

(२) तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी भूमीपूजन केले होते हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नांकित पंढरपूर पिराची कुरोली हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४७ असा आहे. पंढरपूर शहरातील जुन्या सोलापूर नाक्यापासून ते घुमेरा नाला (तालुका हद्द) पर्यतची या रस्त्याची लांबी २१.०० कि.मी. आहे.

त्यापैकी ०/०० ते ४/४०० कि.मी. लांबीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत काम पूर्ण करण्यात आले आहे.

४/४०० ते १२/०० कि.मी. पर्यतच्या लांबीचे काम १० वर्षापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेले होते. तथापि, सद्यस्थितीमध्ये ही लांबी खराब झालेली आहे.

१२/०० ते १४/९०० कि.मी. लांबी ही खराब झाली असून दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

१४/९०० ते १७/६०० कि.मी. या लांबीतील रस्त्याचे मजबूतीकरण व दोन पुल बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत चतु: जन्मशताब्दी योजनांतर्गत सन २०१२ मध्ये पूर्ण झालेले आहे.

१७/६०० ते २१/०० कि.मी. लांबीतील रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तथापि, यात्रा काळात सदर रस्ता प्राधान्याने वाहतूक योग्य ठेवला जातो.

प्रश्नांकित रस्त्याच्या खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील उल्हास नदीवरील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३१) * १३०६१५ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील उल्हास नदीवरील कर्जत-दहिवली, नेरळ-दहिवली व पाषाणे-वांगणी या पुलांची दुरवस्था झाल्यामुळे पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नादुरुस्त पुलावरून मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असल्यामुळे कोणत्याही क्षणी पूल कोसळून अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाल्याने सदरचे पूल तातडीने दुरुस्त करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उल्हास नदीवरील उक्त पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कर्जत दहिवली व नेरळ-दहिवली पुलांच्या बाबतीत हे खरे नाही.

पाषाणे डोणे वांगणी रेल्वे स्टेशन ते काराव चरगाव रस्त्याच्या सा.क्र. २/८०० मधील पुलाच्या धावपट्टीचा डांबरी पृष्ठभाग व रेलिंग काही ठिकाणी खराब झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या अखत्यारित असलेल्या पाषाणे वांगणी दरम्यानच्या पुलावरुन अवजड वाहतुक बंद करण्यात आली आहे. अवजड वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.
(२) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) व ४) प्रश्न उद्‌भवत नाही.
पाषाणे वांगणी पुलाची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून पुलाच्या धावपट्टीच्या डांबरी पृष्ठभागाची व खराब रेलींगच्या दुरुस्तीचे काम सन २०१८-१९ मध्ये प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली-नांदेड या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३२) * १२९६४० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली-नांदेड या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावरील बाळापूर जवळील वळणावरील मोठ्या खड्डयामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार हिंगोली-नांदेड माहमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर लांबीतील रस्त्याच्या पृष्ठभागावर अंशत: खड्डे पडल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर ठिकाणच्या खड्डयांची दुरुस्ती संबंधीत ठेकेदारामार्फत करण्यात येऊन सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

हिंगोली-कळमनुरी-नांदेड या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ रस्त्याच्या (सा.क्र.१२६/०० ते २०३/००) एकूण ७७.०० कि.मी. लांबीमध्ये नियतकालिक दुरुस्ती करणे व मजबुतीकरण करणे या कार्यक्रमांमधून कामे करण्यात आली असून सदर लांबीत सदयस्थितीत दोष दायित्व कालावधी सुरु आहे.

त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती संबंधीत ठेकेदारामार्फत करण्यात येऊन सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) * १३१९६६ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील महसूल व पोलिस विभागांनी वाळू माफियांशी संगनमत केले असल्याने जिल्हयात मोठ्या प्रमाणात वाळूचा अवैध उपसा सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदसर येथे पकडण्यात आलेल्या वाळूच्या अवैध ट्रॅक्टरला रावेर येथील दुचाकीचा नंबर टाकल्याचे निष्पन्न झाले असतानाही या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापही गुन्हा दाखल न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करून संबंधित दोषींविरोधात तसेच जळगाव जिल्हयातील वाळू माफिया व त्यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) दि.२७/५/२०१८ रोजी रात्री अंदाजे ११.३० वा. चांदसर ते पथराड दरम्यान धरणगांव तहसिल कार्यालयाचे पथकास ट्रॅक्टर या वाहनातून वाळूची अवैध वाहतूक करतांना आढळून आल्याने संबंधित ट्रॅक्टर मालकास महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ चे कलम ४७(७) नुसार दंडात्मक रक्कमेचे आदेश बजावणेत आले होते. सदर दंडात्मक रक्कम शासनजमा न केल्याने संबंधिताच्या जमिनीच्या गाव नमुना नं.७/१२ वर दंडात्मक रक्कमेचा बोजा चढविण्यात आला आहे. तसेच अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर हा दुचाकीचा क्रमांक वापरत असल्याचे निदर्शनास आल्याने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांनी सदर प्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

मोटार वाहन न्यायाधिकरण, जळगांव येथे खटला दाखल केला असून सदर वाहन पोलीस ठाणे पाळधी, ता.धरणगांव येथे जमा आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खानापूर, आटपाडी व पलूस (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेती अवजार खरेदीचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३४) * १२७३०८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, आटपाडी व पलूस (जि.सांगली) तालुक्यामधील लाभार्थी शेतकऱ्यांना शेती अवजार खरेदीसाठी दिले जाणारे अनुदान अद्यापही मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थी शेतक-यांना अनुदान मिळाले नसल्याने शेतक-यांच्या खरेदीवर अवलंबून असणाऱ्या ट्रॅक्टर व्यावसायिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन लाभार्थी शेतकऱ्यांना शेती अवजार खरेदीसाठीचे अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या वर्षात सांगली जिल्यातील खानापूर, आटपाडी व पलूस तालुक्यातील पुर्वसंमती प्राप्त पात्र लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

| तालुका | लाभार्थ्यां संख्या | अनुदान (रक्कम रु. लाखात) |
|---|---|---|
| खानापूर | ३६ | ४०.०८ |
| आटपाडी | ९५ | १०६.८२ |
| पलूस | १०९ | २५२ |

सन २०१८-१९ मध्ये अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना निवड पत्रे व पुर्वसंमती पत्रे देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे भोत्रा (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथे सीना नदीवर पुल बांधण्याबाबत

**(३५) * १३२०६१ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भोत्रा (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथे सीना नदीवर पुल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली असून येथील नागरीकांनी सुद्धा मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास याबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी पुल नसल्यामुळे व गावातील ५० टक्के लोकांची शेती व वस्ती नदीच्या दुसऱ्या बाजूला असल्याने नदीपात्रात पाणी असताना शेतकऱ्यांना व शालेय विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून होडीतून प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार भोत्रा येथे सीना नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर ठिकाणची पाहणी करण्यात आली आहे.
(४) सीना नदी ही उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा तालुक्याच्या व सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीवरुन वाहते. या नदीच्या काठावर परंडा तालुक्यातील भोत्रा हे गाव असून परंड्यापासून भोत्रा गावापर्यत २.०० कि.मी. लांबीचा ग्रामीण मार्ग

क्र. ८९ आहे. या ठिकाणी मोठा पूल बांधणे आवश्यक आहे.या पुलाच्या बांधकामासाठी अंदाजे रु.२००.००लक्ष इतका निधी आवश्यक आहे. इतका निधी जिल्हा परिषदेस उपलब्ध होणे शक्य नसल्याने सदर पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योजनांमधून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

सद्यस्थितीत भोत्रा गावाजवळ असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावरुन जाण्या-येणेसाठी पर्यायी व्यवस्था आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर-पालघर या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३६) * १३२२०६ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर-पालघर या रस्त्याची पावसामुळे दूरवस्था झाली असल्याने रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरुन मोठया प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असून अनेक विद्यार्थी व नागरिक प्रवास करत असल्याने दुरुस्तीअभावी अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय व त्यानुसार बोईसर-पालघर या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर रस्त्याची क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे. सदर रस्त्याचे काम शासनाच्या हायब्रीड ॲन्युटी योजनेअंतर्गत मंजुर असून, निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली आहे. उद्योजकामार्फत सद्यस्थितीत सदर रस्त्यावर देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

-----------------

## मेहकर ते नेमतापूर (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३७) * १२८२३८ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर ते नेमतापूर (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या रस्त्याचे काम गत पंधरा वर्षापासून रखडले असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती झाली नसल्यामुळे रस्त्यावरील एसटी सेवाही बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्तीचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या खडीकरणाचे काम जिल्हा नियोजन विकास निधीमधुन सन २०१४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच सदर रस्त्यावर पुला अभावी अद्याप बस वाहतुक सुरु झालेली नाही.

(४) सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निधी व निकष यांचे अधिन राहून सन २०१८-१९ मध्ये जिल्हा परिषद बुलढाणा मार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यांमध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊन सोयाबीन पिकाचे झालेले नुकसान

**(३८) * १३२८६८ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये ढगाळ वातावरणामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊन हजारो हेक्टरवरील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली असतानाही सदर प्रकरणी पंचनामे न केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह पंचनामा करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व लोहारा तालुक्यामध्ये करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१८रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे दिल्याचे निदर्शनास आले.

त्यानुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी उस्मानाबाद यांनी उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसमवेत पाहणी केली असता तुरळक ठिकाणी अल्प प्रमाणात नुकसान पातळीच्या खाली करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. पुढील काळात करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून रोग नियंत्रणाबाबत व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गावांत जिंदाल कंपनीच्या ब्रेकवॉटर वॉलमुळे लाटांचे पाणी शिरुन झालेले नुकसान

**(३९) * १२६४३१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारूळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ आदी गावांत माहे जून २०१७ मध्ये तसेच दिनांक १३ ते १७ जुलै, २०१८ या कालावधीमध्ये लाटांचे पाणी लोकवस्तीत शिरल्याने घरे व नारळी, पोफळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले तसेच येथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीमध्ये लाटांचे येणारे पाणी अडविण्यासाठी बांधण्यात आलेल्या भिंतीमुळे (ब्रेकवॉटर वॉल) लाटांची उंची वाढुन पाणी लोकवस्तीत शिरले असे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ तसेच दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी शासनाकडे पत्रव्यवहार करून चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, खडकवासला, पुणे अभ्यास करुन दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी दिलेल्या

अहवालात ब्रेकवॉटर वॉलमुळेच लाटांची उंची वाढून पाणी लोकवस्तीमध्ये जात असल्याचा निष्कर्ष काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने सदर कंपनीविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच स्थानिकांच्या झालेल्या नुकसानाची आर्थिक भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांच्या दि.८.८.२०१८ च्या अहवालानुसार १३ ते १७ जुलै, २०१८ च्या कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे ब्रेकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे, याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्यांना अधिकची माहिती आवश्यक आहे. तद्नुसार पतन अभियंता, रत्नागिरी यांनी दि.९.८.२०१८ रोजीचे पत्रान्वये व्यवस्थापक, जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून मागविण्यात आलेली माहिती अद्याप अप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील प्रॉपर्टी कार्डामधील चुका दुरुस्त करण्याबाबत

**(४०) * १३२३३१ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) शहरातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या सनद नामक प्रॉपर्टी कार्डामध्ये अनेक चुका झाल्या असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या चुकांमुळे एका व्यक्तीचे घर दुस-याच्या नावावर तर अनेक प्रकरणी भाडेतत्वावर असणाऱ्या नागरिकांना घराचे मालक दाखविले

असुन या चुकांच्या दुरुस्तीसाठी नागरिकांना स्वखर्चाने तालुका भूमी अभिलेख कार्यालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार नागरिकांच्या प्रॉपर्टी कार्डामधील चुका तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजा सिंदी रेल्वे येथील नगर परिषद हद्दीतील नगर भूमापनाचे काम नगरभूमापन नियम पुस्तिका व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार करण्यात आले. नगर भूमापन करण्यात आलेल्या सनदी मिळकत धारकांना वाटप करण्यात आले असता, सनद प्राप्त धारकांकडून नावात त्रुट्या बाबत ५१ अर्ज, क्षेत्रात त्रुट्याबाबत ९८ अर्ज, नावांतरण नोंदी बाबत ७२ तक्रारी व सनद न मिळाल्याबाबत ३७ तक्रारी अर्ज असे एकूण २५८ तक्रारी अर्ज उपअधीक्षक, भूमि अभिलेख, सेलू व जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, वर्धा यांच्याकडे प्राप्त झाले आहेत.

सदर तक्रार अर्जावर नगरभूमापन नियम पुस्तिका नियम १२९ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १०६, १५५, २४७, २५७ व २५८ मधील तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे श्रीपूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे राज्य शेती महामंडळाने केलेले नुकसान

**(४१) * १३१८१४ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे श्रीपूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीवर अतिक्रमण केलेल्या १२० एकर क्षेत्रामध्ये

शेतकऱ्यांनी पिकविलेली ऊस, केळी, डाळींब ही पिके महामंडळाने जमीनदोस्त केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षापुर्वी शेती महामंडळाची जमीन एका कंपनीने भाडे तत्वावर घेवुन त्या जमिनीचे लहान भाग करून स्थानिक शेतकऱ्यांना केवळ एक वर्षाच्या खंडावर कसण्यासाठी दिलेली सदर पडीक जमीन पिकविण्यासाठी वीज, विहीर, बोअर, शेततळी आदि सुविधांसाठी लाखो रूपये खर्च करून फळबागाची लागवड केलेली असताना एक वर्षातच सदर जमीन महामंडळाने सोडायला लावल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेती महामंडळाने ५० एकरापासून १०० एकरापर्यंत ब्लॉक पाडल्यामुळे शेतकरी मोठ्या क्षेत्राचे ब्लॉक घेण्यास तयार होत नसल्यामुळे अनेकदा निविदा काढूनही त्यास प्रतिसाद मिळाला नसल्याचे निदर्शनास आले असुन ज्याप्रमाणे कंपनीने जमिनीचे लहान-लहान ब्लॉक करून शेतक-यांना परवडेल अशा पध्दतीने शेती खंडाने कसायला दिली त्याप्रमाणेच शेती महामंडळाने देखील जमिनीचे लहान-लहान ब्लॉक करून देण्याची मागणी श्रीपूर, महाळुंग, मिरे, जांभूड, बोरगांव, वेळापूर, खंडाळी येथील शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने शेती महामंडळाने देखील जमिनीचे लहान-लहान ब्लॉक करून देण्यासह शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मौजे श्रीपूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) या मळयावरील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची ३७३९ एकर २५ गुंठे जमीन संयुक्त शेती पध्दतीने जाहीर “ई- निविदे” द्वारे मे.अधिरथ ट्रेडिंग प्रा.लि. या कंपनीस १० वर्षाच्या करारावर देण्यात आली होती.

सदर करारनाम्याच्या शर्त व अट क्र.५ (अ) मध्ये “दुसरा पक्ष (म्हणजे कंपनी) यांनी दरवर्षी ३१ मे पूर्वी कराराची रक्कम पहिला पक्ष (म्हणजे शेती

महामंडळ) यांचेकडे मुदतीस न भरल्यास दि.१ जून पासून ते रक्कम देईपावेतो म्हणजे ३० जून या कालमर्यादेपर्यंत थकित रकमेवर द.सा.द.शे. १८% दराने व्याज भरावे लागेल. दि. ३० जून पर्यंत व्याजासह थकीत रक्कम न भरल्यास सदरचा करारनामा संपुष्टात आला असे समजण्यात येऊन त्यावेळी जमिनीत उभ्या असलेल्या पिकावर पहिला पक्ष (म्हणजे शेती महामंडळ) यांचा हक्क राहील." अशी तरतूद आहे. त्यानुसार सदर कंपनीने शेती महामंडळास व्याजासह देय असलेली रक्कम जमा केलेली नसल्याने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने अधिरथ ट्रेडिंग प्रा.लि. या कंपनीसोबत केलेला करार दि. १६/०९/२०१६ रोजी रद्द करण्यात आला होता.

सदर करारातील अट क्र. १३ (ब) नुसार अन्य व्यक्तीस अथवा संस्थेस सदरचे क्षेत्र लागवडीकरिता देता येणार नाही अशी तरतुद असताना देखील कंपनीने त्यांच्या स्तरावर संयुक्त शेतीसाठी देण्यात आलेले क्षेत्र नियमबाहयरित्या त्या परिसरातील व्यक्तींना परस्पर लागवडीकरीता दिले. तत्पूर्वी सोलापूर येथून प्रसिध्द होणाऱ्या दैनिकामध्ये दि. २३/०७/२०१६ रोजी सदर शेती बेकायदेशीररित्या उप कराराने घेऊ नये असे जाहीर निवेदन प्रसिध्द केले होते.

अधिरथ ट्रेडिंग प्रा.लि. या कंपनीने नियमबाहय सहसंयुक्त शेती धारक म्हणून शेती कसण्यासाठी दिलेल्या काही शेतकऱ्यांनी सप्टेंबर, २०१८ पर्यत पिके घेण्याचे सुरु ठेवून ऊसाची व इतर पिकाची लागवड करीत होते. सबब, कोणत्याही शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने संयुक्त शेतीसाठी जमीन दिलेली नाही व करारनामा देखील केलेला नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने उक्त कंपनीसोबत केलेला संयुक्त शेतीचा करार रद्द केल्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांना "ई- निविदे" मध्ये भाग घेता यावा यासाठी मौजे श्रीपूर,ता.माळशिरस, जि. सोलापूर येथील एकूण सुमारे ३७३९ एकर क्षेत्राचे सुरवातीस २५ ब्लॉक पाडण्यात आले व त्याप्रमाणे "ई- निविदा" प्रक्रिया जानेवारी, २०१८ मध्ये करण्यात आली. त्यामध्ये १७ ब्लॉकसाठी उच्चतम दराच्या निविदाधारकांना आदेश देण्यात आले होते. तथापि, त्यामधील केवळ ३ निविदाधारकांनी वेळेत रकमा शेती महामंडळाकडे जमा केल्या. उर्वरित १४ निविदाधारकांचे आदेश रद्द करण्यात आले.

संयुक्त शेती पध्दतीने शेती कसण्यासाठी “ई-निविदा” प्रसिध्द केल्यामुळे काही शेतकऱ्यांनी स्वत:हून शेतातील पिके काढून घेतली होती. त्यातील ५ शेतकऱ्यांनी दिवाणी न्यायालय व मा.उच्च न्यायालय येथे दावे दाखल केले. परंतु मा. न्यायालयाने सदर “ई-निविदा” प्रसिध्द करण्यास स्थगिती दिली नाही. तद्नंतर स्थानिक शेतकऱ्यांना “ई- निविदे” मध्ये भाग घेता यावा म्हणून सदर मळयातील उर्वरित क्षेत्राचे छोटे-छोटे एकूण ३७ ब्लॉक पाडण्यात आले असून ते ब्लॉक “ई- निविदे” मार्फत संयुक्त शेती करारा‌द्वारे कसण्यासाठी देण्याबाबत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागझरी, लालोंडे, किराट, निहे व गुंदले (ता.जि.पालघर) या परिसरात बेकायदेशीर खदानी सुरु असल्याबाबत

**(४२) * १२६५१९ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागझरी, लालोंडे, किराट, निहे व गुंदले (ता.जि.पालघर) या परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर खदानी सुरु असल्याचे व सदर खदानी शासकीय नियमांचे उल्लंघन करून खोदकाम करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात २० मीटर खोदण्याची परवानगी घेऊन ५० ते ६० मीटर खोदकाम करण्यात येत असून परवान्यापेक्षा जास्त गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचेही दिनांक ९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पालघर जिल्ह्यातील सदरच्या अवैध खदानीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) मौजे नागझरी, लालोंडे, किराड, निहे व गुंदले या गावात असलेल्या दगडखाणी, क्रशरप्लांट, आर.एम.सी. प्लांटची तपासणी तहसिलदार, पालघर यांच्या मार्फत करण्यात आली असून त्यानुषंगाने संबंधितांना नोटीसा काढण्यात येत आहेत. उक्त ठिकाणच्या खाणपट्टाधारक यांनी परवानगीपेक्षा अधिक प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८(७) अनुसार दंडनीय कारवाई करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणात चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४३) * १३११९६ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात विशेषत: अलिबाग, मुरुड, उरण, पेण, कर्जत (जि.रायगड) व दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात तसेच रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास चक्रीवादळ आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चक्रीवादळात येथील भात शेतीचे, घरांचे, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, उरण, पेण, कर्जत तालुक्यात व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात दिनांक २८ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास चक्रिवादळ आल्याचे निदर्शनास आले. तथापि, रत्नागिरी जिल्ह्यात सदर कालावधीदरम्यान चक्रिवादळ झाले नसून चक्रिवादळ सदृष्य स्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले.
(२) व (३) रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सदर चक्रिवादळामुळे शेतीपिकांच्या व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत महसूल व कृषी विभागांमार्फत संयुक्त पंचनामे करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

तसेच सदर चक्रिवादळामुळे रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या घरांच्या नुकसानीबाबत क्षेत्रीय स्तरावर पंचनामे सुरु असून शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(४४) * १२७०९८ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार**

**(सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.किशोर पाटील (पाचोरा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश जिल्हयात गतवर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस, किडी व बोंडअळीचे संकट आदीमुळे खरीपाचा हंगाम पुर्ण उध्दवस्त झालेला असून पैसेवारी ५० पैशाच्या आत असताना देखील ८२ टक्के शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१७ च्या खरीप हंगामात विमा कंपन्यांनी ८२.७३ लाख शेतकऱ्यांकडून ४१७.५१ कोटींचा प्रीमियम विम्याचा हप्ता वसूल केला असून राज्य शासनाचे १६०२.३० कोटी व केंद्र शासनाचे १६०२.३० कोटी असा एकूण ३६२२ कोटी ११ लाखांचा विमा हप्ता कंपन्यांना जमा केला असता त्याच्या तुलनेत आतापर्यंत फक्त १८२६ कोटी १६ लाखांची भरपाई दिल्याचे शासनाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खरीप हंगामात पिक विमा भरलेल्या साडेबारा लाख शेतकऱ्यांपैकी सात लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाईतून वगळण्यात आले असून मराठवाडयात ३० लाख शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाईतून वगळल्याचे माहे ऑगस्ट,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन केज (जि.बीड) तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रावरील मुग, सोयाबीन, कापूस,

बाजरी, तूर या पिकांचे नुकसान होवूनही शेतकरी पिक विमापासून वंचित राहिले आहेत, तसेच अमरावती जिल्हयात असंख्य पात्र शेतकरी पिक विम्याच्या लाभापासून वंचित असून भंडारा जिल्हयातील तुमसर व मोहाडी तालुक्यातील २७२ ऑफलाईन खाजगी पिक विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पिक विमा नामंजूर करण्यात आला असल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पिक विमा देणेबाबत संबधित कंपनीस आदेशित करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ तातडीने शेतकऱ्यांना देण्यासह पात्र शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवणाऱ्या पिक विमा कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

आणेवारी / पिक पैसेवारीच्या आधारे पिक विमा नुकसान भरपाई निश्चित करण्यात येत नाही. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत एखाद्या महसुल मंडळातील अधिसूचित पिकाचे पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त सरासरी उत्पन्न हे त्या महसुल मंडळाच्या उंबरठा उत्पन्नापेक्षा ज्या प्रमाणात कमी असते त्या प्रमाणात महसुल मंडळातील सहभागी सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई निश्चित केली जाते.

(२) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार खरीप हंगाम २०१७ मध्ये राज्यातील एकुण ८६.६७ लाख शेतकऱ्यांनी रुपये ४०६.८१ कोटी विमा हप्ता भरुन ५०.४६ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते. याकरिता केंद्र शासनाकडून रु.१५८८.९१ कोटी व राज्य शासनाकडून रु.१५८८.९१ कोटी इतका असे एकूण

रु.३५८४.६४ कोटी विमा हप्ता भरण्यात आला आहे. विमा कंपन्यामार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार ४९.९६ लाख शेतकऱ्यांना रुपये २५६५.९८ कोटी नुकसान भरपाई विमा कंपन्या मार्फत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

(३) मराठवाडयातील औरंगाबाद, जालना, बीड, लातुर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली या जिल्हयातील एकुण ६४.८० लाख शेतकऱ्यांनी रुपये १०९.८७ कोटी विमा हप्ता भरुन ३३.१८ लाख हेक्टर क्षेत्र विमा सरंक्षित केले होते. विमा कंपन्यामार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार या जिल्हयांतील ४१.९२ लाख शेतकऱ्यांना रुपये १८४०.४२ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत अदा करण्यात आली आहे.

बीड जिल्हयातील केज तालुक्यातील मुग, सोयाबीन, कापूस, बाजरी, तुर या पिकांसाठी विमा संरक्षण घेतलेल्या १.०९ लाख शेतकऱ्यांनी ०.६५ लाख हेक्टर क्षेत्र विमा सरंक्षित केले होते. विमा कंपन्यामार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार जिल्हयातील ४८९८ शेतकऱ्यांना रुपये १.३७ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत अदा करण्यात आलेली आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार खरीप हंगाम २०१७ मध्ये अमरावती जिल्हयातील एकुण ११.०८ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रुपये ६७.८९ कोटी विमा हप्ता भरुन १.१५ लाख हेक्टर क्षेत्र विमा सरंक्षित केले होते. विमा कंपन्यामार्फत प्राप्त अहवालानुसार ०.४५ लाख शेतकऱ्यांना रक्कम रुपये ६३.४८ कोटी नुकसान भरपाई विमा कंपन्या मार्फत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

भंडारा जिल्हयातील तुमसर तालुक्यातील एकुण १२६ पात्र शेतकऱ्यांनी २०८.१३ हेक्टर क्षेत्र ऑफलाईन पध्दतीने विमा सरंक्षित केले आहे. तसेच मोहाडी तालुक्यातील एकुण १६ पात्र शेतकऱ्यांनी २१.६५ हेक्टर क्षेत्र ऑफलाईन पध्दतीने विमा सरंक्षित केले असून नुकसान भरपाई अदा करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे आहे.

शासनाला दि.२५.७.२०१८ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे. उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा या तालुक्यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने

शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत धोरणात्मक कार्यवाही शासनास्तरावरुन सुरु आहे.

(५) विभागीय कृषि संचालक लातूर व अप्पर जिल्हा अधिकारी लातूर यांचे संयुक्त स्वाक्षरी प्राप्त अहवालामध्ये लोहारा तालुक्यात सोयाबीनचे एकूण १२ प्रयोग घेण्यात आले असून ज्या प्रयोगाची खात्री होऊ शकली नाही असे (जेवळी व आष्टा का. प्रत्येकी २) असे एकूण ४ प्रयोग वगळल्यास नुकसान भरपाईसाठी उर्वरित ८ प्रयोग कमी पडत असल्यामुळे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नजीकच्या महसूल मंडळ गटातील उत्पादकतेच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा.लि.आणि ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रा.लि.यांनी शासनाच्या महसूलाचे नुकसान केल्याबाबत

**(४५) * १२७४६४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा.लि.आणि ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रा.लि.यांनी संगनमत करुन मौजा मोगरा (ता.अंधेरी) येथील भुखंड क्रमांक ४३१, ३४६ व ३४७ या भुखंडाच्या डिड ऑफ कनव्हेंस मध्ये बनावट कागदपत्राच्या आधारे खोटी माहिती देवून शासनाच्या करोडो रूपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर फौजदारी कारवाई तसेच बुडविलेला संपुर्ण महसूल वसुल करण्याबाबतचे निवेदन दिंनाक १२ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री व प्रधान सचिव, महसूल विभाग यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त कंपन्यांवर फौजदारी कारवाई करून बुडविलेला संपूर्ण महसूल वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) लोकप्रतिनिधी यांनी, "सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा.लि. आणि ओमकार रिअलटर्स अंधरी प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी संगनमत करुन मौजा मोगरा ता.अंधेरी भुखंड क्र.४३१, ३४६,३४७ या भुखंडावर बोगस कागदपत्राच्या आधारे डिड ऑफ कन्व्हेन्स मध्ये खोटी माहिती देवून शासनाच्या करोडो रुपयाचा महसूल चोरी केल्यामुळे फौजदारी कार्यवाही करणेबाबत" अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांना दि.१२ ऑगस्ट, २०१८ रोजी तक्रार तथा निवेदन दिले आहे.

उक्त तक्रारीच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत सदर प्रकरणाची चौकशी केली असता, उक्त दस्तांचे पुनर्मुल्यांकन झोपडपट्टी विरहित प्रमाणे करुन ९ प्रकरणांपैकी ६ प्रकरणांमध्ये रु.१,११,५७,२००/- इतके मुद्रांक शुल्क कमी असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुसार, ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रोजेक्ट प्रा.लि. (संबधित पक्षकार) यांना मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांनी दि.२२ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे उक्त कमी भरलेले रु.१,११,५७,२००/- इतके मुद्रांक शुल्क शासनखाती जमा करण्याची नोटीस दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर हिरानंदानी सर्कल ते कोपरा गावापर्यंत सर्विस रोड बांधण्याबाबत

**(४६) * १२६७९८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर**

**(कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील खारघर हिरानंदानी सर्कल ते कोपरा गावापर्यंत सर्विस रोड नसल्याने वाहतूकीची कोंडी होऊन प्रवाशांची गैरसोय होत असल्याने उक्त ठिकाणी सर्विस रोड बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील ठाणे खाडीवरील वाशी पुलाचे बांधकाम तसेच वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार खारघर हिरानंदानी सर्कल ते कोपरा गावापर्यंत सर्विस रोड बांधुन ठाणे खाडीवरील वाशी पुलाचे बांधकाम तसेच वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित व प्रकल्पाचे कंत्राटदार (M/s Reliance-Astaldi Joint Venture) यांच्यादरम्यान करारनामा करण्यात आलेला असून प्रत्यक्ष बांधकामास माहे डिसेंबर, २०१८ पासून सुरुवात होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) खारघर हिरानंदानी सर्कल ते कोपरा गावापर्यंत सर्विस रोड बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास्तरावर प्रलंबित नाही.

ठाणे खाडीवरील वाशी पुलाचे बांधकाम करण्यासाठी मे. एल अँड टी यांना दिनांक ३०.०८.२०१८ रोजी स्वीकृतीपत्र देण्यात आले असून कंत्राटदार व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्यादरम्यान करारनाम्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांबारे (ता.शहापूर,जि.ठाणे) येथे भुयारी मार्ग बांधण्याबाबत

**(४७) * १२८५८७ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) गावातील ग्रामस्थांना बाजारपेठ तसेच नोकरीनिमित्त व विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी रोज शहापूर शहरात जाताना मुंबई-आग्रा महामार्ग क्रमांक ३ ओलांडून जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावरुन लहान-मोठी वाहने, ट्रक, टँकर इत्यादींची सतत वर्दळ असुन महामार्ग ओलांडताना वारंवार अपघातांच्या घटना घडत असल्याने उक्त महामार्गावर कांबारे फाटयावर गावात प्रवेश करण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यांबाबतची मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार कांबारे फाटयावर गावात प्रवेश करण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. दि.०४.१०.२०१८ च्या निवेदनाव्दारे कांबारे (ता.शहापूर, जि.ठाणे) गावातील ग्रामस्थांनी भुयारी मार्गाची मागणी केली

आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(३) व (४) सदर मागणी प्राप्त झाल्यानंतर त्या ठिकाणचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ मधिल वडपे-गोंदे कि.मी.४४०/०० ते ५३९/५०० या रस्त्याच्या प्रस्तावित सहापदरीकरणाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारास कांबारे ग्रामस्थांनी मागणी केलेल्या भुयारी मार्गाबाबत तांत्रिकदृष्टया पडताळणी करुन सदर मागणी प्रस्तावित सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये विचारात घेण्याकरिता प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नाशिक यांनी कळविले आहे.

(५) प्रस्तुत मागणी प्राप्त होताच, सदर प्रकरणी अ.क्र.३ व ४ मध्ये उल्लेखिल्यानुसार कार्यवाही हाती घेण्यात आली असल्याने या प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पशुवैद्यकीय चिकित्सालयांमधील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४८) * १२९१४६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात १६ पशुवैद्यकीय दवाखाने असुन कशेळे, वैजनाथ, गौरकामथ, कळंब व कर्जत येथील लघु पशुवैद्यकीय चिकित्सालयांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यात गाई, म्हशी, शेळी यांचे पालन केले जात असुन डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे सदरहू जनावरांना साथीच्या रोगाची लागण झाल्यास शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार कर्जत तालुक्यातील पशु वैद्यकीय दवाखान्यांमधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) व (२) रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यात श्रेणी-१ चे १० व श्रेणी-२ चे ६ असे एकूण १६ पशुवैदयकीय दवाखाने कार्यरत आहेत. कर्जत,कशेळे,वैजनाथ,गौरकामथ व कळंब येथे श्रेणी-१ चे ५ पशुवैदयकीय दवाखाने कार्यरत असून तेथे पशुधन विकास अधिकारी या संवर्गात एकूण मंजूर पदांची संख्या ५ आहे. सदर पदे माहे जून, २०१८ पासून रिक्त असुन सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून पशुपालकांच्या जनावरांना नियमितपणे वैद्यकीय सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

तसेच या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कार्यक्षेत्रात कोणतीही साथीचा रोग उदभवल्याची नोंद तसेच पशुवैदयकीय सेवेबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) भविष्यात सरळसेवा तसेच पदोन्नतीच्या मार्गाने पदभरती करतांना कर्जत तालुक्यातील वरील प्रमाणे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील दुध संघाच्या शीतकरण केंद्रामध्ये खाजगी दुधाचे शीतकरण करुन पुनर्जीवन समितीने केलेला गैरव्यवहार

**(४९) * १३३१९५ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील दुध संघाच्या एमआयडीसीमधील दुध शीतकरण केंद्रामध्ये खाजगी दुधाचे शीतकरण केले जात असून प्रतिदिन दहा ते वीस हजार लिटर दुधाचे शीतकरण करुन पुनर्जीवन समितीने ३५ ते ४५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध संघाचे सन २००५ ते २००७ या कालावधीत संचालक मंडळाच्या गैरकारभारामुळे २ कोटी २ लाखांचे नुकसान झाल्याने संघावर अवसायकाची नियुक्ती झाली असून संघाची पुनर्जीवन समिती स्थापन करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय. या विषयास अनुसरून तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१ च्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यात येऊन चौकशी अहवाल सादर केलेला आहे. परंतु सदर चौकशी अहवालाविरूध्द संस्थेचे अध्यक्ष यांनी सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचेकडे अपील दाखल केले होते. त्यासंदर्भात सहनिबंधक यांनी दि. १४/०५/२०१५ रोजी कलम ८३ खालील चौकशी अहवालास अंतरिम स्थगिती दिली होती. सदर स्थगिती सहनिबंधक यांच्या दि.२९/१२/२०१७ च्या आदेशान्वये उठविण्यात येऊन कलम ८८ अन्वये चौकशी प्रक्रिया सुरू ठेवण्याबाबत आदेशित केले आहे. यासंदर्भात संस्थेचे माजी चेअरमन व इतर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं. ६४२०/२०१८ दाखल केलेले आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी कलम ८८ नुसार चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे झालेला गैरव्यवहार

**(५०) * १३२५२३ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे अधिकारी व कंत्राटदार यांनी ई-टेंडर नोटीस क्र.४ व ५ मध्ये बनावट दस्तावेजांच्या आधारे गैरव्यवहार केल्याने दोषींवर कारवाई करण्याची मागणी तुमसर विधानसभेचे लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तक्रारकर्ते यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे तसेच याप्रकरणी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांचे कार्यालयातून बनावट ई-मेल आयडी तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली हे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) तक्रारकर्त्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली, याबाबत अवगत नाही. बनावट ई-मेल आयडीबाबत पोलीस यंत्रणेमार्फत तपास सुरू आहे.

(३) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक व अध्यक्ष, जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती तथा जिल्हाधिकारी, जळगाव यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) संबंधित कंत्राटदार श्री.विनय सोनू बढे यांच्या विरूध्द जिल्हा पेठ पोलिस स्टेशन, जळगाव येथे प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यात आला आहे व त्यांना अटकही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मंडणगड व गांधी चौक (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) यादरम्यान नवीन पूल बांधण्याबाबत

**(५१) * १३१७९६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड व गांधी चौक (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) यांना जोडणाऱ्या ब्रिटीशकालीन पूलाची दुरवस्था झाल्याने पूल धोकादायक होऊन कोणत्याही क्षणी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलावरून वाहतूक सुरु ठेवणे धोकादायक झाले असल्याने या ठिकाणी नवीन पुल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मंडणगड व गांधी चौक यादरम्यान नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सदर पुलाच्या कर्ब मधील स्टील उघडे पडले आहे. त्यामुळे पुलाच्या ॲबेटमेंटची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तथापि, सद्यस्थितीत पूलावरील वाहतूक सुरळीतपणे सुरु असून पूल धोकादायक असल्याचे आढळून आले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर पुलाची पाहणी करण्यात आली आहे.

(४) सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम सन २०१८-१९ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम अंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात किटकनाशक फवारणीमध्ये शेतकरी व शेतमजुरांचे झालेले मृत्यु

**(५२) * १२६६६७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात विशेषत: भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ व नागपूर येथे पिकांवर फवारणी करण्यात येणाऱ्या किटकनाशांमुळे १० जणांचा बळी गेला असून सुमारे ३१६ शेतकरी व शेतमजूरांना विषबाधा झाल्याचे निदर्शनास आल्याची माहिती उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात कापूस व सोयाबीनवरील अळयांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी किटकनाशक फवारणीमुळे भंडारा जिल्हयातील ८, गोंदियातील १२३, गडचिरोलीतील २, चंद्रपूर जिल्हयातील ५ व वर्धा जिल्हयातील ३३ असे मिळून १७१ शेतकऱ्यांना विषबाधा झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयात कापसाच्या पिकावरील तसेच अन्य पिकावर पडणाऱ्या बोंडअळीच्या आक्रमणाला रोखण्यासाठी किटकनाशकांची फवारणी करीत असताना माहे, ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्यादरम्यान १२३ शेतकऱ्यांना विषबाधा झाली असून त्यापैकी ६ शेतकऱ्यांची प्रकृती गंभीर आहे, तसेच सन २०१७ मध्ये सुध्दा या जिल्हयात किटकनाशकाची फवारणी करीत असताना ९०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना विषबाधा होऊन त्यात २२ शेतकऱ्यांचा व शेतमजूरांचा मृत्यू झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, किटकनाशक फवारणीदरम्यान होणारी विषबाधा टाळण्यासाठी किटकनाशक प्रतिबंधात्मक संच मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विषबाधा टाळण्यासाठी किटकनाशक फवारणीबाबत जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजनेसह मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व संबंधित बनावट किटकनाशके उत्पादन करणाऱ्या दोषीं उत्पादकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्राप्त अहवालानुसार माहे सप्टेंबर २०१८ अखेर विदर्भातील भंडारा, गोंदीया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ व नागपूर या जिल्हयात फवारणी करणाऱ्या शेतकरी/शेतमजूर यांना उलटया, मळमळ होणे असा त्रास झाल्याने उपरोक्त संबंधित जिल्हयातील विविध शासकीय रुग्णालयात ६९५ रुग्णांच्या नोंदी झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी ७ रुग्ण दगावले आहेत. तथापि, सदर मृत्युंचा व्हिसेरा अहवाल अप्राप्त असल्याने सदरचे चार रूग्णांचा मृत्यु किटकनाशके प्राशन करून अथवा किटकनाशके फवारणी करताना विषबाधा झाल्याबाबत संदिग्धता आहे.

(२) किटकनाशकांच्या फवारणीमुळे विदर्भातील भंडारा जिल्हयात १७, गोंदिया ८, गडचिरोलीमध्ये १०, चंद्रपुर १६२ व वर्धा जिल्हयात ३४ याप्रमाणे एकुण २३१ शेतमजुर / शेतकरी यांना किटकनाशकांच्या वापरामुळे विषबाधा झाल्यामुळे संबंधित जिल्हयातील विविध शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या नोंदी झाल्या आहेत.

(३) प्राप्त अहवालानुसार यवतमाळ जिल्हयामध्ये ४४६ शेतकरी/शेतमजुर यांना विषबाधा झाल्याने उपचारा करीता दाखल करण्यात आले होते व यासर्व शेतकरी/शेतमजुर यांना उपचार करून सुट्टी देण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ मध्ये यवतमाळ जिल्हयात किटकनाशके फवारणी करताना विषबाधा झालेल्या ७९८ शेतकरी/शेतमजूर यांना रुग्णालयामध्ये उपचार करुन घरी पाठविण्यात आलेले आहे व उर्वरित मृत्यू पावलेल्या २१ शेतकरी/शेतमजूरांच्या कुटूंबियांना प्रत्येकी रु.४ लाख प्रमाणे अर्थसहाय्य करण्यात आलेले आहे.

(४) राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये किटकनाशकांची फवारणी करणाऱ्या शेतमजूर / शेतकरी यांना ६३,८१५ संरक्षक कीटस् उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(५) भारतीय दंड संहिता, १८६० मधील ३०४-A अंतर्गत यवतमाळ जिल्हयात मे. युपीएल लि. उत्पादकावर व दोन किटकनाशके विक्रेत्यांवर त्यांचे मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल या किटकनाशकांच्या अनुषंगाने गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. मे. घरडा केमिकल्स या किटकनाशक उत्पादकासह एकूण आठ विक्रेत्यांवर किटकनाशके कायदा, १९६८ व

किटकनाशके नियम, १९७१ मधील तरतूदींचे उल्लंघन झाल्याने त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

किटकनाशकांच्या हाताळणीमुळे होणारी विषबाधा रोखण्यासाठी ६,४८,९७२ शेतमजूर/शेतकरी यांना प्रशिक्षण, २९८ कार्यशाळांद्वारे २१,९३२ उत्पादक, वितरक व विक्रेते यांना मार्गदर्शन, किटकनाशकांच्या काळजीपुर्वक हाताळणीसाठी ८२,३४५ पोस्टर्स, ४६ ठिकाणी जिंगल्स, ४,१६,७७९ माहितीपत्रिका, फवारणी करणाऱ्या शेतमजुर/शेतकरी यांची ५७ आरोग्य तपासणी शिबिरे, आकाशवाणी केंद्रावर १८ प्रक्षेपणे, दुरदर्शनवर ७ कार्यक्रम प्रसिद्धी, ६३,८१५ संरक्षण कीटस् ची उपलब्धता शेतकऱ्यांना मोबाईल संगणक प्रणालीद्वारे २४७.६० लाख संदेश इत्यांदीद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे.

ज्या किटकनाशकांमुळे शेतमजूर/शेतकरी यांना विषबाधा झालेली आहे अशा पाच किटकनाशकांच्या वितरण, विक्री व वापरावर किटकनाशक कायदा, १९६८ मधील तरतुदीच्या अनुषंगाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ ते १४ नोव्हेंबर, २०१८ या ६० दिवसांच्या कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत.

राज्यात किटकनाशक विषबाधा प्रकरणी मृत्यू झालेल्या ६३ शेतमजूर/ शेतकऱ्यांना प्रत्येकी एकसमान रु. ४.०० लाख प्रमाणे आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात थायी मांगुर (क्लारीअस बॅट्राशस) माशाची होत असलेली विक्री

**(५३) * १३३२३४ कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने थायी मांगुर (क्लारीअस बॅट्राशस) या माशावर बंदी घातलेली असतानाही त्याची विक्री राज्यातील विविध भागांमध्ये होत

असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मांगुर माशामुळे कॅन्सर वाढीसाठी पोषक असणारे विषाणू शरीरात पसरत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मांगुर माशांच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

"थायी मांगूर" (क्लारीअस बॅट्राशस) या जातीच्या मांगूर माशांवर शासनाने बंदी घातलेली नाही.

(२) हे खरे नाही.

"थायी मांगूर" (क्लारीअस बॅट्राशस) या जातीच्या मांगूर माशांमध्ये कॅन्सर वाढीसाठी पोषक असणारे विषाणू शरीरात पसरत असल्याबाबत कोणतेही अहवाल/अभिलेख प्राप्त नाही. तरी सदर विषयाबाबत केंद्रिय वैज्ञानिकांकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.

(३) "थायी मांगूर" (क्लारीअस बॅट्राशस) जातीच्या मांगूर माशांवर शासनाने बंदी घातलेली नाही. त्यामुळे "थायी मांगूर" मासे विक्रीवर आळा घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी पश्चिम (मुंबई) येथील कोकीळाबेन धिरुभाई अंबानी रुग्णालयाने जमिनीचे हस्तांतर तसेच विश्वस्तांमध्ये बदल करताना शासनाची परवानगी न घेतल्याबाबत

**(५४) * १२६८८६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पश्चिम (मुंबई) येथील कोकीळाबेन धिरुभाई अंबानी या धर्मादाय रुग्णालयाला दिलेल्या जमिनीचे हस्तांतर तसेच विश्वस्तांमध्ये बदल करताना शासनाची परवानगी न घेतल्याबाबत तसेच सदर जागेत, केशकर्तनालय, गिफ्ट शॉप, फूडकोर्ट व रिलायन्स ग्रुपचे कार्यालय सुरु केल्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी अनर्जित उत्पन्नाची रक्कम ५७.८४ कोटी जमा करण्याचे आदेश दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास देऊनही त्याचे पालन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणतीही शहानिशा न करता दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास अंतिम आदेश पारित करुन फेरचौकशी करुन गुणवत्तेनुसार आदेश पारित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी फेरचौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, फेरचौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुणवत्तेनुसार पारित करण्यात आलेल्या आदेशाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील सर्व्हे नं. १४१अ, न.भू.क्र. ८३३ (भाग) च्या अभिन्यासातील भूखंड क्र.१ (क्षेत्र १२०५० चौ.मी.) या मालती वसंत हार्ट ट्रस्ट या संस्थेला हृदयरोग संशोधन केंद्र व रुग्णालय बांधण्यासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने मंजूर केलेल्या जमिनीचे संस्थेचे विश्वस्थ बदलून शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण झाल्याचा निष्कर्ष जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २/१२/२०१४ रोजीच्या आदेशान्वये काढला. तसेच अशा शर्तभंगाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे अधिकार शासनाकडे असल्याने आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे या आदेशाद्वारे निदेश दिले.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द संस्थेने तत्का. मा.मंत्री (महसूल) यांचेकडे फेरतपासणी अर्ज दाखल केला. सदरहू अर्जावर वेळोवेळी सुनावण्या घेऊन मा. मंत्री (महसूल) यांनी दिनांक १६/०५/२०१८ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. या आदेशान्वये अर्जदार मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांचा फेरतपासणी अर्ज मंजूर करण्यात येऊन, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दि. २.१२.२०१४ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले असून या प्रकरणी फेरचौकशी करुन गुणवत्तेवर आदेश पारित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.१२.११.२०१८ रोजी सुनावणी घेऊन प्रकरण आदेशासाठी बंद केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे बोढरे व शिवापूर (ता.चाळीसगाव, जि.जळगांव) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याबाबत**

**(५५) * १२९८७७ श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलास करतील काय :-

(१) मौजे बोढरे व शिवापूर (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील शेतकऱ्यांच्या गौताळा अभयारण्यालगतच्या इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये समाविष्ट असलेल्या नवीन अविभाज्य शर्तीच्या जमिनी मे.फर्मीसोलर फार्मस् प्रा.लि.ठाणे व जे.बी.एम.सोलर पॉवर महाराष्ट्र प्रा.लि. या कंपन्यांनी हस्तगत केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रार करुन सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना द्यावा तसेच खरेदी व्यवहाराला आणि प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त प्रकरणातील दोषींविरुध्द कारवाई करुन शेतकऱ्यांना नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) (३) व (४) मौजे बोढरे व शिवापूर (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील शेतकऱ्यांच्या जमिनींचे झालेल्या खरेदीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यासंदर्भात दिनांक ३१/०७/२०१८ रोजी शासनास निवेदन सादर केले होते.

तथापि, मौजे बोढरे व शिवापूर ता. चाळीसगाव, जि.जळगाव येथी शेतकऱ्यांकडून मे. फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि. नवी दिल्ली व मे.जे.बी.एम सोलर पॉवर लि. दिल्ली या कंपन्यांनी सदरहू जमिनी संबंधित शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन, वाटाघाटी करुन जमिनीच्या किंमती ठरवून तसेच जमिनीची किंमत संबंधित शेतकऱ्यास अदा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या संमतीने खरेदी केलेल्या आहेत. त्यामुळे नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदरच्या सोलार प्रकल्पांतर्गत जमिनीपैकी काही जमिनी गौताळा अभयारण्य लगतच्या इको-सेन्सेटिव्ह झोनमध्ये असून, या झोनमध्ये "सोलार पॉवर" हा वापर अनुज्ञेय असल्यामुळे गौताळा औट्रम घाट इको-सेन्सेटिव्ह झोन सनियंत्रण समिती, औरंगाबाद यांनी त्या विषयी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यात भोगवटदार वर्ग-२ जमिनी अनधिकृतपणे वर्ग-१ करुन विक्री केल्याबाबत

**(५६) * १३०५४५ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील ८ गावातील प्रकल्पग्रस्तांसाठी प्रस्तावित असलेल्या जमिनी जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून बनावट धरणग्रस्तांना वाटप करण्यात आल्याचे तसेच भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनींचा शेरा बदलून अनधिकृतपणे वर्ग-१ करून जमीन विक्री केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट कागदपत्र तयार करून महसूल विभागातील कर्मचारी आणि काही एजंट यांनी संगनमताने केलेल्या या घटनेची तात्काळ सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करून शेतकऱ्यांसह शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत व प्रस्तावीत प्रकल्पग्रस्तांना जमिन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) क्षेत्रिय स्तरावर नियमानुसार चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विभागीय आयुक्त, पुणे यांनी सदर प्रकरणाशी संबंधित महसूल नायब तहसिलदार यांना सेवेतून निलंबित केले आहे. तसेच बनावट पुनर्वसन आदेशाबाबत "जैसे थे परिस्थिती" ठेवण्याबाबत सहाय्यक जिल्हाधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, खेड यांनी दि. १८.९.२०१८ रोजी आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आपत्ती व्यवस्थापन केंद्रासाठी अधिकाऱ्यांच्या पदांची निर्मिती करण्याबाबत

**(५७) * १२७३०१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २९ जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन केद्रांची निर्मिती करण्यात आली असुन कायमस्वरुपी स्वतंत्र पदांची निर्मिती केली नसल्याने नैसर्गिक आपत्तीच्या दुर्घटना घडत आसतानाही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ही दोन्ही पदे केवळ तात्पुरत्या वा कंत्राटी पद्धतीने भरण्यात येते असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपत्ती व्यवस्थापन केद्रांतील आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांची कायमस्वरुपी स्वतंत्र पदांची निर्मिती करण्यात आली नसल्याने आपत्तीग्रस्तांना वेळेवर आवश्यक मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माळीणसारखी दुर्घटना घडलेल्या पुणे जिल्ह्यात व नाशिक जिल्ह्यातही पदांची निर्मिती न केल्याने आपत्ती व्यवस्थापनाचे काम प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन आपत्ती व्यवस्थापन अधिका-यांची स्वतंत्र पदनिर्मिती करुन कायमस्वरुपी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ६ विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक आणि ३४ जिल्हा आपत्ती अशी एकूण ४० कंत्राटी पदे दिनांक २१ जानेवारी,२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रथमत: ३ वर्षाकरिता निर्माण करण्यात आली होती. या पदांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून सदर पदांची मुदत ३१ मार्च,२०१९ पर्यंत आहे.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नवीन पद निर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १८.४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील सर्व ३६ जिल्हांकरिता ३६ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि ६ विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक अशी एकूण ४२ पदे दि.१.४.२०१९ पासून कायमस्वरुपी निर्माण करण्यास आणि सदर पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) मुख्य दुग्धशाळेसह संलग्न, प्रशासकीय व निवासस्थानांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(५८) * १२६९४६ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी (मुंबई) मुख्य दुग्धशाळा, संलग्न इमारती, प्रशासकीय इमारतीसह निवासस्थानांच्या इमारती धोकादायक अवस्थतेत असल्याने या इमारतींच्या दुरुस्तीकरिता सुमारे १० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्याबाबतचे

निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.दुग्धविकास राज्यमंत्री यांच्याकडे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी येथील या इमारतींची पाहणी शासनाने केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) सदरच्या इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संरचनात्मक परिक्षण पाहणी (Structural Audit) करण्यात आले असून सदर इमारती अत्यंत नादुरुस्त स्थितीत असल्याचे आढळून आले आहे. संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार इमारतींचे संरचनात्मक दुरुस्त्या व मजबूतीकरण केल्यास १० ते १५ वर्षे इमारतींचे वयोमान वाढू शकते. तसेच प्रत्येक ३ वर्षानंतर इमारतींची सविस्तर पाहणी व संरचनात्मक परिक्षण करण्याचे ही परीक्षण अहवालात स्पष्ट केले आहे.
(३) वरळी येथील इमारतींची आवश्यक दुरुस्तीसाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजात रु.३.३४ कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. अतिरिक्त निधी उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा राजुरवाडी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील अवैध उत्खननाबाबत

**(५९) * १२९९१० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा राजुरवाडी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील मुरूमाच्या खदाणीत जेसीबीच्या सहाय्याने अवैधरीत्या गौण खनिजाचे उत्खनन सुरु असल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सुरु असलेल्या अवैध उत्खननावर महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरच्या अवैध खदानीवर तसेच याकडे दुर्लक्ष करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) दि.३० सप्टेंबर, २०१८ रोजी तहसिलदार, मोर्शी यांना दुरध्वनीद्वारे मिळालेल्या माहितीनुसार व मोबाईलद्वारे केलेल्या छायाचित्रणानुसार मौजे राजुरवाडी, ता.मोर्शी येथे जे.सी.बी.द्वारे मुरुमाचे उत्खनन केल्याचे व ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द तहसिलदार, मोर्शी यांचे स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आळंदी वाघाड मध्यम प्रकल्पाकरिता मौजे रवळगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला वाढीव दराने देण्याबाबत

**(६०) * १२७४११ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळंदी वाघाड मध्यम प्रकल्पाकरिता मौजे रवळगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील गट क्र.२२२ मधील संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना सन १९८६ पासून अद्यापपर्यंत न मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या संपादीत जमिनीचा मोबदला वाढीव दराने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) गट क्र.२२२ मधील क्षेत्र ३.३४ हे.आर संपादीत जमिनीचा मोबदला रु.१२,२०९/- संबंधित शेतकऱ्यांना सन १९८५ मध्ये अदा करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम २८-अ च्या तरतुदीप्रमाणे रु.८९,४८९/- इतका वाढीव मोबदला सन १९८७ मध्ये अदा करण्यात आला आहे.

-----------------

## मंचर व तांबडेमळा (अवसरी फाटा) (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील बसस्थानकांची झालेली दुरवस्था

**(६१) * १२९७९७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एस.टी बस स्थानकात खड्डे असल्यामुळे पावसाळयात जागोजागी पाणी साचत असून एस.टी आगारात प्रवाशांना प्रवेश करणेही अडचणीचे होत असताना त्याकडे आगार व्यवस्थापन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जुलै २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच तांबडेमळा (अवसरी फाटा) येथे एस.टी आगाराचे काम पूर्ण झाले असले तरी अजून उद्घाटन झाले नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाद्वारे मंचर येथील बसस्थानकातील खड्डे खडी व मुरुमाने भरण्यात आलेले आहेत. तसेच, बसस्थानकातील वाहनतळाच्या डांबरीकरणासाठीच्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. निविदेअंती ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली होती. परंतू, काम करण्यास ठेकेदाराने नकार दिल्यामुळे सदरचे काम प्रलंबित होते. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाद्वारे दि.०५.०९.२०१८ अन्वये नव्याने निविदा मागविण्यात आलेली असून, सदर निविदा उघडण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे.
(२) व (३) मंचर येथील तांबडेमळा अवसरी फाटा येथे नवीन आगाराचे काम पूर्ण झाले आहे. परंतू, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे सदरचे आगार सुरु करता आलेले नाही. तथापि, जुन्या मंचर बसस्थानकातून प्रवासी वाहतूक सुरु असल्याने प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील वाळू तस्करांवर कारवाई करण्याबाबत

**(६२) * १२८७७७ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बनपिंप्री (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) परिसरातील हिरडगाव रस्त्यावर वाळूची तस्करी करणारा ट्रॅक्टर पकडल्यामुळे वाळू तस्कर व महिलांनी हत्याराच्या सहाय्याने प्रांताधिकारी, मंडळाधिकारी व तलाठयावर प्राणघातक हल्ला केला असून त्यात प्रातांधिकारी गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू तस्करांविरुध्द कारवाई करण्याबाबत संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी आश्वासन दिलेले असतानाही तालुक्यात मोठया प्रमाणात वाळू तस्करी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार श्रीगोंदे तालुक्यातील वाळू तस्करांवर तसेच या प्रकरणातील दोषीविरूध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर, जि.अहमदनगर हे दि.१६/९/२०१८ रोजी त्यांच्या अधिनस्थ पथकासमवेत अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी गेले असता बनपिंप्री शिवारात त्यांच्यावर व पथकातील कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात आला.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) सदर घटनेबाबत श्रीगोंदा पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द दि.१७/०९/२०१८ रोजी गु.र.नं. ४६४/२०१८ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील वित्त बाभळगाव (ता.लातूर), माळकोंडी(ता.औसा), कबनसांगवी (ता.चाकूर) येथील शेतकऱ्यांची रायझिंग सन सिड्स कंपनीकडुन झालेली फसवणूक

**(६३) * १२८२२४ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील वित्त बाभळगाव (ता.लातूर), माळकोंडी (ता.औसा), कबनसांगवी (ता.चाकूर) येथील शेतकऱ्यांना रायझिंग सन सिड्स कंपनीकडून

सोयाबीन पिकाचे बियाणे घेऊन लागवड केली असता सोयाबीन रोपांना हवे तसे पिक आले नसल्याने शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी, लातूर यांचेकडे माहे जुलै, २०१८ वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होऊन त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या रायसिंग सन सिड्स कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) बाभळगाव,ता.जि.लातूर येथील एका शेतकऱ्याने रायझिंग सन सिड्स कंपनीचे सोयाबीन बियाणे न उगवल्याबाबतची तक्रार पंचायत समिती, लातूर या कार्यालयाकडे केलेली होती. या संदर्भात शिवशक्ती कृषि सेवा केंद्राने सदर शेतकऱ्यास बियाणांचा परतावा परत केल्याने संबंधित शेतकऱ्याने त्याचा तक्रार अर्ज परत घेतलेला आहे.

माळकोंडी, ता.औसा तालुक्यातून सोयाबीन पिकाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

कबनसावंगी, ता.चाकूर येथील एका शेतकऱ्याची सोयाबीन पिकाच्या उगवणी संदर्भात तक्रार प्राप्त झालेली असून तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीने शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर जाऊन पाहणी केली असता, सदर बियाणे सदोष असल्याचा निष्कर्ष समितीने दिलेला आहे. या संदर्भात कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, नुकसान भरपाईच्या अनुषंगाने ग्राहक मंचात दाद मागण्याबाबत संबंधित शेतकऱ्यास मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत ते बदलापूर या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(६४) * १२८८५८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत ते बदलापूर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणत खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे होऊन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि चालु पावसाळयादरम्यान रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन घेण्यात आले असुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील जय गुरुदेव जिनिंग मिलमध्ये बनावट किटकनाशकासह खतांची निर्मिती व विक्री होत असल्याबाबत

**(६५) * १२८३०४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील गुरुदेव जिनिंग मिलच्या आवारात बनावट किटकनाशके व खतांची निर्मिती व विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जय गुरुदेव जिनिंगच्या गोदामावर दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास रात्री पोलीसांनी धाड टाकून ६ लाख २० हजार रुपयांची बोगस किटकनाशके, खत आणि बंदी असलेल्या बीजी-४ कपाशीच्या २६५ बॅगा जप्त केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जय गुरुदेव जिनिंग प्रेसिंगचा मालक श्री.सचिन अरुन कवळे आणि जय गुरुदेव कृषी केंद्राचा संचालक श्री.चंद्रशेखर थोटे यांनी बनावट किटकनाशके आणि खतांची निर्मिती सुरु केली असुन येथे वापरण्यात आलेले केमिकल पुणे येथून एका कंपनीमार्फत पुरवठा केल्याचे व सदरहू जे.जी.ॲग्रो केमिकल राज्यात १५ जिल्हयात कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार बनावट किटकनाशके व खतांची निर्मिती व विक्री करणाऱ्या संबंधितांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

कृषि विभागाच्या तक्रारीनुसार पोलिस यंत्रणा व कृषी विभागाने संयुक्तरित्या धाड टाकून बनावट बियाणे, रासायनिक खते व किटकनाशकांचा साठा जप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) सदर प्रकरणी पोलिस यंत्रणेमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) याप्रकरणी मे. जय गुरुदेव जिनिंग ॲन्ड प्रेसिंगचे प्रो. प्रा. श्री. सचिन कावळे व जय गुरुदेव जिनींग ॲन्ड प्रेसिंगचे सहमालक व जय गुरुदेव कृषि

केंद्रोचे प्रो.प्रा.श्री.चंद्रशेखर गणेशराव थोटे यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, कळंब, जि.यवतमाळ येथे दिनांक १२/०९/२०१८ रोजी एफ.आय.आर. दाखल केलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील उरमोडी जलाशयामुळे बाधित झालेल्या गावांच्या पुनर्वसनाबाबत

**(६६) * १२७१७० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील उरमोडी जलाशयात बाधित झालेल्या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने उरमोडी जलाशयामध्ये जलसमाधी घेण्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सातारा यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार उरमोडी जलाशयात बाधित झालेल्या गावांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकल्पग्रस्तांनी निवेदन दिले असले तरी चर्चेनंतर आंदोलन मागे घेतले. मौ.वेणेखोल ता.सातारा येथील उरमोडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे मूळ

नियोजन मौ.पळशी, ता.माण येथे करण्यात आले होते. तथापि, प्रकल्पग्रस्तांनी मौ.पळशी ता.माण येथे पुनर्वसन करण्याऐवजी मौजे म्हसवड, ता.माण येथे पुनर्वसन करण्याबाबतची मागणी केली आहे.

(३) जिल्हाधिकारी सातारा यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागणीच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालानुसार दि.७.८.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे मौ.वेणेखोल ता.सातारा येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे मूळ नियोजनात बदल करुन मौ. म्हसवड ता. माण येथे करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन न झाल्याबाबत

**(६७) * १३०६१७ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातळगंगा, तळोजा, रोहा, विळे-भागाड, उसर (जि.रायगड) या औद्योगिक वसाहती तसेच आरसीएफ, आयपीसीएल, ओएनजीसी, जेएनपीटी, इस्पात या विविध प्रकल्पांसाठी शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी अधिगृहीत केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी अधिगृहीत केल्या आहेत त्यांचे पुनर्वसन अद्यापही झालेले नसून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदलाही अद्याप मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना धरणातील काही प्रकल्पग्रस्तांचे सन १९६० मध्ये रोहा, पेण व पनवेल (जि.रायगड) या तालुक्यात पुनर्वसन करण्यात आले असुन अद्यापही या पुनर्वसित वस्त्यांना पुरेशा सोयी सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन तसेच त्यांच्या जमिनीचा मोबदला न दिल्यास यापुढे रायगड जिल्हयात नवीन प्रकल्प घेण्यास शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतची चौकशी करुन रायगड जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही

सदर प्रकल्पांतर्गत जमीन अधिगृहीत केलेल्या शेतक-यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला आहे.

(३) कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या पेण, पनवेल, रोहा, खालापूर, माणगांव व सुधागड (पाली) या सहा तालुक्यात ३५ वसाहती व १२ वाडी पाडे असून सदर वसाहतींना महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(४) अशी बाब नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मारेगाव ते पूर्णा (ता.पूर्णा, जि.परभणी) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याबाबत

**(६८) * १२९६५० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव ते पूर्णा (ता.पूर्णा, जि.परभणी) या ५ किमी लांबीच्या रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने १९ कोटी रुपचे खर्च करून केलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याने अडीच महिन्याच्या कालावधीतच रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारासह संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्ता मारेगाव ते पूर्णा असा नसून माटेगाव ते पूर्णा असा आहे. सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतुक सुरळीत सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिगवण-सांगली या मार्गावरील खानापूर ते तासगांव या टप्प्यातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(६९) * १२७४७१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिगवण-सांगली (राज्य मार्ग क्र.६०) या मार्गावरील खानापूर ते तासगांव या टप्प्यातील रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर अनेक खड्डे पडल्याने प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता नागरिकांनी वारंवार मागणी करुनही संबधित अधिकाऱ्यांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार भिगवण-सांगली या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्ता अहमदनगर मठेवडगाव काष्टी दौड बारामती विटा तासगांव सांगली हा रा.मा. ६० असा आहे.

(२), (३) व (४) सदर रस्ता जानेवारी, २०१७ मध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० असा घोषित झाला आहे. तथापि अद्याप रस्त्याचे हस्तांतरण झालेले नाही. मागील काही काळापासून या रस्त्यावर मजबुतीकरण व नुतनीकरणाची कामे न झाल्याने द्वैवार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

मंजूर निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार सदर रस्त्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांचा डिझेल परतावा प्रलंबित असल्याबाबत

**(७०) * १२६५८० श्री.भास्कर जाधव (गुहागर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील सागरी मासेमारी करणाऱ्या सुमारे १८०० नौकांचा ३० कोटींचा डीझेल अनुदान परतावा दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रत्नागिरी जिल्ह्यात मत्स्योत्पादनात होणारी लक्षणीय घट, डिझेलसह मासेमारी साहित्यांच्या किंमतीत झालेली वाढ, दुषित सागर किनारे, बंदी काळातील मासेमारी, परप्रांतीय ट्रालर्सचे किनारपट्टीवरील आक्रमण, पारंपारिक ते अत्याधुनिक पद्धतीचा अवलंब करुन मासेमारी करणाऱ्या बोटींची वाढती संख्या आदींमुळे मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित डिझेल परतावा तात्काळ देण्यासह मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित असलेल्या रु.६०.०० कोटी इतक्या निधीपैकी रु. ४२.०० कोटी इतका निधी सात सागरी जिल्ह्यांना वितरीत करण्यात आला असुन सदर निधीपैकी रत्नागिरी जिल्ह्याकरिता रु. ७.०० कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील अन्नपूर्णा व राधा मत्स्यव्यवसाय महिला शेतकरी गटांना निधीचे वाटप करण्याबाबत

**(७१) * १३२५५५ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील अन्नपूर्णा मत्स्यव्यवसाय महिला शेतकरी व राधा मत्स्यव्यवसाय महिला शेतकरी गट यांना मासळी विक्रीसाठी फिरते

वाहन उपलब्ध करून देणे या योजनेअंतर्गत उर्वरित अनुदान वाटप करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मत्स्यविकास मंत्री यांना दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ या वर्षात निवड झालेल्या या महिला शेतकरी गटांना अनुदानाची एकूण रक्कम १० लक्ष रुपये पैकी ६ लक्ष रुपये संयुक्त खात्यात जमा झाले असून उर्वरित ४ लक्ष रुपये निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगणघाट येथील अन्नपूर्णा व राधा मत्स्यव्यवसाय महिला शेतकरी गट यांना उर्वरित निधीचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) प्रस्तावित योजनेमध्ये १००% अर्थसहाय्यापैकी ४०% अनुदान हे राष्ट्रीय मत्स्यिकी विकास मंडळ यांचेकडून प्राप्त न झाल्याने सदर योजना राबविता आली नाही. सबब, सदरची योजना जिल्हा नियोजन समिती (DPC) कडील प्रती लाभार्थी रु.६.०० लक्ष व लाभार्थीकडील रु.०.६६ लक्ष असे एकूण रु.६.६६ लक्ष मध्ये राबविण्यास या विभागाच्या दिनांक ६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालयातून दिलेल्या वाहन परवान्यांबाबत

**(७२) * १२६८३८ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालयातून टॅक्सी व रिक्षांचे १५ हजारांचे डीडी न भरताच ३ हजार प्रवासी वाहनांना परस्पर परवाना दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवाने दिलेली रक्कम वसूल करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने ३ हजार गाडयांच्या मालकांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार परवाने दिलेली रक्कम वसुल करण्यासह संबंधित दोषीं अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, दि.१७.०६.२०१७ पासून रिक्षा परवान्यावरील निर्बंध हटविल्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी येथे एकुण १९,०६८ ऑटोरिक्षा नोंद झाल्या, त्यापैकी १७,०२२ ऑटोरिक्षा मालकांनी रु.१५,०००/- अतिरिक्त परवाना शुल्क भरुन परवाने प्राप्त केले असून २०४६ रिक्षा मालकांनी शुल्क भरलेले नाही व अद्यापी परवाना प्राप्त करून घेतलेला नाही, असे निष्पन्न झाले आहे.

(२) अतिरिक्त परवाना शुल्क भरुन परवाना प्राप्त न करता वाहतूक करणाऱ्या २०४६ वाहनमालकांना व त्यांच्या वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना शुल्क भरणा करण्यास्तव नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत.

(३) सद्यस्थितीस २०४६ रिक्षांपैकी १६५६ ऑटोरिक्षा मालकांकडून अतिरिक्त शुल्काची रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित ३९० ऑटोरिक्षांची अतिरिक्त शुल्क वसुलीची बाब कार्यवाहीखाली आहे. सदर प्रकरणाची चौकशी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेमार्फत करण्यात आली. ऑटोरिक्षा नोंदणी व परवाना वाटप प्रक्रियेची हाताळणी पूर्वी मानवी पध्दतीने होत असे. ही हाताळणी संगणकीय प्रक्रियेमार्फत करणे सुरु करताना सुरुवातीच्या कालावधीत सदर प्रकार घडल्याचे आढळून आले असून कार्यपध्दतीतील त्रुटी दुरुस्त करण्याच्या उपाययोजना अंमलात आणण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील भात पिकांवर खोडकिडीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(७३) * १२८५८८ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात भात पिकांवर खोडकिडयाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भात पिकांवर खोडकिडयाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जिल्हयातील भात पिकांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह खोडकिडयाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. क्रॉपसॅप अंतर्गत वेळीच खोडकिडा नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना अवगत केल्याने आर्थिक नुकसान झाले नाही.

(३) क्रॉपसॅप अंतर्गत एकुण २,३३६ भात प्लॉटचे नियमित सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(४) खोडकीडा नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर औषधांचे वाटप करण्यात आले असुन शेतकरी मेळावे, पोस्टर, माहिती चित्ररथ, फेरोमन ट्रॅप, वर्तमानपत्र, लिफलेट, जम्बो झेरॉक्स, माहितीपत्रके इ. माध्यमातुन शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा-आगलीवाडी येथील खाडीवर पूल बांधण्याबाबत

**(७४) * १३२०५९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा-आगलीवाडी येथील मच्छिमार बांधवांना मच्छी सुकविण्यासाठी खाडीच्या दुसऱ्या भागाकडे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाडीवर पूल नसल्यामुळे मच्छिमारांना ओली व सुकी मच्छीची वाहतूक खाडीतुन छोट्या होडीच्या सहाय्याने करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाडीच्या पाण्याच्या प्रवाहामुळे मच्छीची वाहतूक करताना होडी बुडण्याचे प्रकार घडत असल्यामुळे वाहतूक करीत असलेली मच्छी खाडीत पडून मच्छिमारांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन सदर खाडीवर पूल बांधण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) वाहतूक करताना होडी बुडाल्याची एकही तक्रार मत्स्यव्यवसाय विभागास प्राप्त झालेली नाही. वाहतुकीसाठी मासळीची चढ उतार करताना थोड्याफार प्रमाणात मासळीचे नुकसान होते.

(४) सदर खाडीवर पूल बांधण्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून सदर पूल बांधण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु.१.२५ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर पूलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(७५) * १३२४३७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पातील पुनर्वसनासाठी पात्र प्रकल्पग्रस्त शेतकरी श्री.ज्ञानेश्वर शांताराम गुंजाळ/सुतार या शेतकऱ्याने पर्यायी जमीन मिळण्याबाबत प्रशासकीय प्रकिया पूर्ण करून जमीन मिळण्याबाबत वारंवार मागणी करूनही वेळीच जमीन न मिळाल्याने तसेच प्रशासन योग्य प्रतिसाद देत नसल्याने प्रशासनाने वेळेत दखल घेवून निर्णय घेण्यासाठी दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाला निवेदन देवून सामूहिक जलसमाधी घेण्याची सूचना दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनाबाबत प्रशासनाने याची गांभिर्याने दखल न घेतल्याने अखेर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने भामा आसखेड धरणात जलसमाधी घेवून आपले जीवन संपविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत निर्णय घेवून कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यासह जलसमाधी घेतलेल्या प्रकल्पग्रस्ताला न्याय देण्याबाबतची लेखी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यासह जलसमाधी घेतलेल्या प्रकल्पग्रस्ताला न्याय देण्याबाबत व या घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) भामा आसखेड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिकांसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने, दिलेले निर्देश विचारात घेऊन पुनर्वसन अधिनियमातील कलम १६ (२) नुसार प्रकल्पग्रस्तांना नोटीसा देण्यात आल्या आहेत व ६५ % रक्कम भरुन घेऊन पर्यायी जमिन देणेबाबतचा कालबध्द कार्यक्रम क्षेत्रिय स्तरावर ठरविण्यात आला आहे. उप विभागीय अधिकारी, खेड यांनी दि. ३१.१०.२०१८ व दि. ०२.११.२०१८ रोजी कँपचे आयोजन करुन भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात उपलब्ध असलेल्या ६६ हेक्टर ९७ आर जमिनीच्या वाटपाची प्रक्रिया सुरु केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निमढेल (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचे लाभ देण्याबाबत

**(७६) * १२७९९२ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमढेल (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सन १९७६ मध्ये चंदई नाला प्रकल्पाकरिता अत्यल्प दरात बळजबरीने भूसंपादनाने महसूल अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतल्या असुन शेतकऱ्यांना पर्यायी शेतजमीनीसह घरांची शिल्लक रक्कम पूर्णपणे देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य गावातील बाधित शेतकऱ्यांच्या वाटप रजिस्टरमध्ये केलेल्या नोंदीप्रमाणे निमढेल वासीय बाधित शेतकऱ्यांचे वाटप रजिस्टर मुल येथील तहसील कार्यालयात आजही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शेतकऱ्यांना शेतीचा मोबदल्यासह अन्य उपजीविकेसाठी पर्यायी जमीन, पुनर्वसन, प्रकल्पग्रस्तांचे दाखले, प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी उपलब्ध करून दिली नसल्याने सदर भूमिहीन शेतकऱ्यांवर बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला, पर्यायी जमीन, नोकरीतील आरक्षण देण्यासह कागदपत्रे गहाळ करुन पुनर्वसन प्रकरणी जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाकरिता सन-१९७६ ते १९८० या दरम्यान भूसंपादन प्रक्रिया करण्यात आलेली आहे. यासंदर्भातील जनहित याचिका क्रमांक ५५/२०११ ही मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दि.३१.०८.२०१२ रोजीच्या आदेशान्वये खारीज केले असून त्यामध्ये संबंधितांना कायद्यानुसार मोबदला वाटप झाला असल्याचे नमूद आहे.
(२) सदर जमीन संपादनाची कार्यवाही तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.सि.का. चंद्रपूर यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आली. माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सि.का. चंद्रपूर हे पद व्यपगत झाल्यामुळे उपलब्ध अभिलेख उपविभागीय कार्यालय, मूल यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्तांचे मोबदला वाटप रजिस्टर उप विभागीय अधिकारी, मूल यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसून त्याबाबतचा शोध इतर कार्यालयांकडे घेण्याचे काम सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेती पुरक गायी-म्हशी, शेळयांचे गट व कुक्कुटपालन व्यवसाय या योजनांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(७७) * १२८८५० श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल**

**(मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीला जोडधंदा म्हणून राबविण्यात येणाऱ्या गायी-म्हशी, शेळयांचे गट तसेच कुक्कुटपालन व्यवसाय या योजनेतील मागील वर्षाचे ४९ लाख ३ हजार रुपये अखर्चित राहिल्याने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, नाशिक यांनी शासनास परत पाठविल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचे हजारोंच्या पटीत प्रस्ताव प्राप्त झाल्याने प्रशासनाने लॉटरी काढून लाभार्थ्यांची निवड केल्याने बहुतांश लाभार्थी सदरील योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उपायुक्त कार्यालयाने जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागावर आक्षेप ठेवला असून याबाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे लाभार्थ्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अखर्चित राहिलेले ४९ लाख ३ हजार शासनाने परत न घेता उर्वरित लाभार्थ्यांचा त्यात समावेश करुन घेण्याबाबत व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे असून रु. ४८.६४ लक्ष निधी समर्पित करण्यात आलेला आहे.

(२) उक्त योजनांकरिता वर्ष २०१७-१८ मध्ये मंजुर तरतुदीच्या ८० टक्के तरतूद जिल्हा स्तरावर वितरीत करण्यात आली. त्यानुसार सर्वसाधारण योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी नाशिक जिल्हयात एकूण २७३१ अर्ज प्राप्त

झालेले होते. त्यापैकी छाननीअंती ८५४ अर्ज पात्र ठरले, त्यापैकी १३८ लाभार्थ्यांची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात आली व २८१ लाभार्थी प्रतिक्षाधिन ठेवण्यात आले.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक यांनी जिल्हयातील निवड केलेल्या लाभार्थ्यांमध्ये योजनेबाबत तसेच योजनेअंतर्गत लाभार्थी हिस्सा भरण्याबाबत पुरेशी जागरुकता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. या कारणास्तव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

सदर योजनांतर्गत प्राप्त झालेला निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक असल्याने, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक यांचेकडून समर्पित झालेला निधी मागणीनुसार इतर जिल्हयांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(७८) * १२६७१९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील**

**(एरंडोल), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सुभाष साबणे (देगलूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.बबनराव शिंदे (माढा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नारायण पाटील (करमाळा), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण ३५३ तालुक्यांपैकी ३२५ तालुक्यात ५० टक्क्याहून कमी, तर २५४ तालुक्यात २५ टक्क्यापेक्षा कमी पावसाची नोंद झाली असून, यातही तब्बल ४५ तालुक्यांमध्ये पाऊसच पडलेला नाही. तसेच मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह नाशिक, अमरावती, औरंगाबाद, पुणे चार विभागातील

१५ जिल्हयांमध्ये कमी पाऊस पडल्यामुळे राज्यात दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दीड लाख हेक्टरवरील पिके पाण्याअभावी धोक्यात आली असुन नैसर्गिक आपत्त्ती शाखेच्या प्राथमिक अहवालानुसार यवतमाळमध्ये ४६ हजार ६४२ हेक्टर, चंद्रपूरमध्ये ११ हजार १६१ हेक्टर, नांदेडमध्ये ७१ हजार ३४९ हेक्टर, जळगांवमध्ये २५४ हेक्टर, गडचिरोलीमध्ये ९ हजार ६४२ हेक्टर, नंदूरबारमध्ये ६१५ हेक्टर, धुळ्यामध्ये ८५८ हेक्टर, सातार्‍यामध्ये ३१८ हेक्टर आणि सांगली जिल्हयात ४०९ हेक्टर असे एक लाख ४१ हजार २५५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद विभागातील लातूर जिल्हयात सुमारे ५ लाख ४५ हजार ५५७ हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरण्या होऊन त्यामध्ये ४ लाख २ हजार ९९२ हेक्टर सोयाबीनचा समावेश असुन फक्त ६८७ मिमि पाऊस झाल्याने सोयाबीन व खरिपाच्या पिकांच्या नुकसानीची दखल घेत शासनाने दुष्काळ जाहीर करुन सोयाबीन व अन्य खरिपाच्या पिकांना हेक्टरी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये पाऊस न झाल्यामुळे शेतकर्‍यांच्या सोयाबीन, मूग, उडीद, तूर आदी पिकांचे नुकसान झाले असुन उमरगा तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विनंती केली आहे, त्याचप्रमाणे गुंज, उमरा, गौंडगांव, लोणी बु. बाभळगांव, फुलारवाडी, लिंबा, विटा, मुदगल, वाघाळा (ता.पाथरी, जि. परभणी) या गावातील शेतकर्‍यांची सोयाबीन, कापूस ही पिके पावसाअभावी करपून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्हयातील नांदगांव व मालेगांवसह ८ तालुक्यात अत्यल्प पाऊस पडल्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण होवून प्रशासनाने केलेल्या जनर आणेवारीत खरीपातील १ हजार ६७८ पैकी केवळ २३६ गावांमध्ये दुष्काळीस्थिती असल्याचे जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अमरावती विभागातील बुलढाणा जिल्हयात कमी पाऊस पडल्यामुळे खरीपातील प्रमुख पिक असलेल्या सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतक-यांना हेक्टरी ५० हजार रुपये देऊन दुष्काळ जाहिर करावा

अशी मागणी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पुणे विभागातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयांमध्ये पाऊस न पडल्यामुळे ११ लाख हेक्टरवरील खरीप पिकांचे नुकसान होवुन दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून कोकण विभागातील पालघर तलासरी, विक्रमगड (जि.पालघर) या तालुक्यात कमी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या भाताचे पिक करपूर गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यातील अवर्षन तालुक्यांची पाहणी शासनाने केली आहे काय व तद्नुषंगाने पिक परिस्थिती व पाणीसाठयाची स्थितीचा आढावा घेवुन दुष्काळ जाहीर करण्यासह राज्यातील दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार जून ते सप्टेंबर २०१८ या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ अन्वये गंभीर / मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहिर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त ७५० मी.मी. पेक्षा कमी तसेच ७५ टक्के पेक्षा कमी पर्जन्यमान झालेला असेल अशा २६८ महसुल मंडळांमध्ये शासन निर्णय दिनांक ६ नोव्हेंबर २०१८ अन्वये दुष्काळ जाहिर करण्यात आलेला असून दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये व महसुल मंडळांमध्ये खालीलप्रमाणे आठ सवलती जाहिर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सुट

२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषि पंपाच्या चालू विजबिलात ३३.५ टक्के सूट

५) शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शूल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

-----------------

## मुंबई-नाशिक महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(७९) * १२८७६८ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापुर (जि.ठाणे) तालुक्यातील आवरे या गावातील प्रकाश घरत हे आपल्या पत्नी व दोन मुलांना घेऊन मुंबई-नाशिक महामार्गावरुन दुचाकीवर जात असतांना खड्यांमुळे अपघात होऊन त्यात त्यांच्या दोन मुलांचा मृत्यु झाल्याची तसेच पति-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील वडपे ते गोंदे या दरम्यानच्या रस्त्याची अर्धवट कामे पूर्ण करण्यासाठी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनाक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले असून या महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे कसारा घाटात मोठ्या प्रमाणात खड्डे असुन अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे तसेच वारंवार अपघात घडत असतानाही संबंधितांना कोणतीही कार्यवाही न केल्याने दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार मुंबई नाशिक महामार्गाची तातडीने दुरुस्ती करून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द तसेच रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अपघात झाला हे खरे आहे. परंतु सदर अपघात हा खड्डयांमुळे झालेला नसून चार सीटसह चुकीच्या बाजूने गाडी चालविण्यामुळे झाला असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) मुंबई-नाशिक महामार्गावर वडपे ते गोंदे कि.मी.५३९/५०० ते ४४०/०० मधिल चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत बी.ओ.टी. तत्वावर करण्यात आले आहे.

सदर चौपदरीकरणाचे झालेले काम हे केंद्र शासनाच्या विनिर्देशानुसार तसेच नियुक्त स्वतंत्र अभियंत्याच्या देखरेखीखाली झालेले आहे. तथापी सदर रस्त्याच्या बहुतांशी भागामध्ये विशेषत: इगतपुरी आणि कसारा यामध्ये पडणा-या पावसाचे प्रमाण जास्त असल्याने पावसाळयात या ठिकाणी काही प्रमाणात खड्डे निर्माण होतात, ही वस्तुस्थिती आहे. परंतु सदर प्रकल्प सध्या सवलत कालावधी अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या टप्प्यात असल्याने या ठिकाणी पावसाळयात पडलेल्या खड्डयांची दुरुस्ती करण्यात आल्याचे तसेच सदर प्रकरणी कार्यवाही न केल्याने दि. २७ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केल्याचे ज्ञात नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

शिवाय प्रकल्प सवलत कालावधीच्या टप्प्यात असल्याने पावसाळयात सदर महामार्गावर पडणा-या खड्डयांची दुरुस्ती Cold Mix Technology ने तातडीने करणे व पावसाळा संपल्यानंतर सदर ठिकाणची दुरुस्ती डांबरी साहित्याने करणे या बाबी सातत्याने करण्यात येतात. तसेच सदर रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्याकरिता झालेल्या करारनाम्याच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या स्वतंत्र अभियंत्यामार्फत वेळोवेळी

आवश्यक दुरुस्ती करण्यात येते. त्यामुळे सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची बाब प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी नाकारत असल्याचे कळविले आहे. यास्तव प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणे व त्यानुसार कारवाई करण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील रस्त्यांना विशेष रस्ते दुरुस्ती अनुदान देण्याबाबत

**(८०) * १३२४५६ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून तालुक्यामधील भीमाशंकर व आळंदी या धार्मिक स्थळी वाहतुकीचे प्रमाण जास्त असल्याने वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी २५ कोटी विशेष रस्ते दुरुस्ती अनुदान मिळण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जुलै, २०१८ व ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड तालुक्यासाठी गत ३ वर्षात कोणतेही अनुदान मिळाले नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून उक्त मागणीच्या अनुषंगाने खेड तालुक्यातील रस्त्यांसाठी विशेष रस्ते दुरुस्ती अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

खेड तालुक्यासाठी मागील ३ वर्षात अर्थसंकल्पातून एकुण रु. ४२४२.१७ लक्ष इतक्या रकमेची कामे मंजूर झालेली आहेत.

(३) उक्त निवेदनातील रस्त्याच्या कामांना निधी, निकष, प्राध्यन्यक्रमानूसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.